POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२९३ ● मुंबई, मंगळवार, २६ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना व्यवहारिक मराठीचे धडे

रस्त्यावर उतरली पथकं...

सरनाईकांनी दिलेली मुदत संपण्यापूर्वीच धडक मोहीम

राज्यातील रिक्षाचालकांना मराठी भाषा येणे बंधनकारक करण्याच्या मुद्द्यावरून सध्या राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलंच तापलं आहे. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षाचालकांना मराठी येणे आवश्यकच असल्याची आक्रमक भूमिका घेतल्यानंतर आता प्रत्यक्ष कारवाई सुरू झाली आहे. ठाण्यात आरटीओने विशेष आणि धडक तपासणी मोहीम सुरू केली असून, रस्त्यांवर रिक्षाचालकांच्या मराठी ज्ञानाची थेट परीक्षा घेतली जात आहे. मराठी सक्तीच्या अधिकृत अंमलबजावणीला १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असली, तरी ठाणे आरटीओच्या पथकांनी शहरातील विविध भागांमध्ये अचानक तपासणी सुरू केल्याने परप्रांतीय आणि अमराठी रिक्षाचालकांचे धाबे दणाणले आहेत.

काय काय तपासले जात आहे?

प्रादेशिक परिवहन विभागाच्या पथकांकडून ठाणे शहरातील विविध भागांमध्ये अचानक तपासणी मोहीम राबवली जात आहे. यावेळी रिक्षाचालकांचे ड्रायव्हिंग लायसन्स, बॅज, वाहन नोंदणी कागदपत्रे आणि इतर परवान्यांची तपासणी केली जात आहे. त्याचबरोबर चालकांना मराठीत संवाद साधण्यास सांगितले जात असून त्यांना भाषा समजते का आणि ते मराठीत संवाद करू शकतात का, याची चाचणीही घेतली जात आहे.

रिक्षाचालकांच्या प्रतिक्रिया काय?

या मोहिमेबाबत रिक्षाचालकांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया पाहायला मिळत आहेत. काही चालकांनी स्थानिक भाषेचा वापर वाढवण्यासाठी हा उपक्रम योग्य असल्याचे म्हटले आहे, तर काहींनी कारवाईच्या भीतीमुळे नाराजी व्यक्त केली आहे. १५ ऑगस्टनंतर मराठी भाषा न बोलणाऱ्या किंवा आवश्यक नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांवर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने अनेक चालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

दरम्यान, या मुद्द्यावरून राजकीय स्तरावरही मतभेद समोर आले होते. शिवसेना प्रवक्ते संजय निरुपम यांनी सक्ती आणि दंडात्मक कारवाईला विरोध दर्शवला होता. तसेच ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनीही या निर्णयाच्या कायदेशीर बाजूंवर प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक आणि वाहनचालक प्रतिनिधींमध्ये बैठक पार पडली होती. त्यात मराठी सक्तीच्या अंमलबजावणीला १५ ऑगस्टपर्यंत मुदत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

आरटीओच्या या मोहिमेचा उद्देश काय?

आरटीओ अधिकारी राकेश पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोहिमेचा उद्देश प्रवाशांची सुरक्षितता, कागदपत्रांची पडताळणी आणि स्थानिक भाषेचा वापर वाढवणे हा आहे. ठाण्यात पुढील काही दिवस ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचेही सांगितले जात आहे.

१५ ऑगस्टनंतर मुदतवाढ नाही



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्यातील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा सहज बोलता, समजता आणि दैनंदिन व्यवहारात प्रभावीपणे वापरता यावी यासाठी परिवहन विभागामार्फत व्यापक मराठी शिक्षण अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. या उपक्रमात रिक्षा-टॅक्सी संघटनांनी सक्रिय सहभाग घेऊन पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या विशेष बैठकीत राज्यातील विविध रिक्षा व टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींशी मराठी भाषा शिक्षण उपक्रमाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, चालकांना व्यवहारिक मराठी आत्मसात करता यावी यासाठी दररोज चार तासांचे ऑफलाइन प्रशिक्षण दिले जाणार आहे. मराठी संभाषण कौशल्य विकसित करण्यावर विशेष भर देण्यात येणार असून ऑनलाइन प्रशिक्षणाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रशिक्षण अधिक प्रभावी आणि सुलभ व्हावे यासाठी विविध शाखा कार्यालयांमध्ये विशेष वर्ग आयोजित करण्यात येणार आहेत.

मुंबई, ठाणे, डोंबिवली, नवी मुंबई, वसई-विरार, पालघर आणि डहाणू या भागांत प्रारंभी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत.

तसेच कोकण मराठी साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातूनही मराठी शिकविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी सुमारे ४५०० शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यांना मानधन दिले जाणार आहे. शासनाकडून यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आल्याची माहितीही मंत्री श्री. सरनाईक यांनी दिली.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर चालकांची मौखिक परीक्षा घेण्यात येणार असून यशस्वी उमेदवारांना शासनाकडून अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय हिंदी ते मराठी भाषांतर आणि सोपे मराठी संभाषण शिकण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ऑनलाइन ॲपची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या ॲपच्या माध्यमातून चालकांना मराठी शब्द, वाक्यरचना आणि दैनंदिन संवाद सहज शिकता येणार असून मराठी भाषेचा वापर अधिक सुलभ होणार आहे.

या उपक्रमामुळे प्रवासी आणि चालक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होण्यास मदत होईल तसेच मराठी भाषेचा प्रसार आणि वापर मोठ्या प्रमाणात वाढेल, असा विश्वास मंत्री श्री. सरनाईक यांनी व्यक्त केला. मराठी भाषा शिकण्यासाठी १५ ऑगस्ट २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली असून त्यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

ठाण्यातील ९४ टक्के रिक्षाचालक मराठीबहाद्दर

आरटीओच्या तपासणीत उघड



■ठाणे। प्रतिनिधी,

महाराष्ट्रात सार्वजनिक सेवेशी संबंधित प्रत्येक व्यक्तीला मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान असावे, या राज्य शासनाच्या भूमिकेनुसार ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) रिक्षाचालकांची विशेष तपासणी मोहीम राबवली.

महाराष्ट्रात सार्वजनिक सेवेशी संबंधित प्रत्येक व्यक्तीला मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान असावे, या राज्य शासनाच्या भूमिकेनुसार ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) रिक्षाचालकांची विशेष तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेत २३१७ रिक्षाचालकांची तपासणी केली. यात ९४ टक्के रिक्षा चालकांना मराठीत येत असल्याचे उघड झाले. केवळ १४२ चालकांना मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान नसल्याचे आढळून आले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निदेर्शानुसार राज्य शासनाने रिक्षा व टॅक्सीचालकांना स्थानिक भौगोलिक माहितीबरोबरच मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक केले आहे. त्यानुसार ठाणे आरटीओकडून शहरातील विविध भागांत विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत चालकांचे परवाने, बॅज, कागदपत्रांची पडताळणी करण्यासोबतच त्यांना मराठीत संवाद साधता येतो का, प्रवाशांनी सांगितलेले पत्ते समजतात का, तसेच दैनंदिन व्यवहार मराठीत करता येतात का, याचीही तपासणी करण्यात आली.

प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी केलेल्या तपासणीदरम्यान बहुतांश रिक्षाचालकांना मराठीत सहज संवाद साधणे शक्य असल्याचे दिसून आले. त्यामुळे ठाणे शहरातील रिक्षाचालकांमध्ये मराठी भाषेबाबत जागरूकता वाढत असल्याचे सकारात्मक चित्र समोर आले आहे. सार्वजनिक वाहतूक सेवेत स्थानिक भाषेचा वापर वाढल्यास प्रवाशांनाही अधिक सुलभ आणि विश्वासार्ह सेवा मिळण्यास मदत होणार असल्याचे मत परिवहन विभागाकडून व्यक्त करण्यात आले.

पालघर अपघातातील मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाखांची मदत वितरित

■मुंबई। प्रतिनिधी,



पालघर जिल्ह्यातील धानिवरी येथे १८ मे रोजी झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झालेल्या १३ नागरिकांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेनंतर एकूण ६५ लाख रुपयांच्या मदतीची रक्कम जिल्हाधिकारी, पालघर यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत वितरित करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून संबंधित प्रशासकीय आदेशही जारी करण्यात आले आहेत.

१८ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे चार वाजण्याच्या दरम्यान डहाणू तालुक्यातील धानिवरी परिसरात टेम्पो आणि कंटेनरची समोरासमोर भीषण धडक होऊन मोठा अपघात झाला होता. अपघात इतका गंभीर होता की टेम्पोचा पूर्ण चुराडा झाला. या दुर्घटनेत १३ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर १७ जण जखमी झाले होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, पोलीस आणि आरोग्य विभागाच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य सुरू केले. जखमींना त्वरित जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांनी मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला होता. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत देण्यास तातडीने मंजुरी दिली. या प्रकरणी मृतांच्या वारसांची पडताळणी करून मंजूर मदत तातडीने वितरित करण्याबाबत जिल्हा प्रशासनास निर्देश देण्यात आले आहेत.

अपघातात मृतांची नावे :

या अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये सुरेश रत्ना लाखात (वय ४७), पांडू गणपत लाखात (वय ४५), कलु गोविंद लाखात (४८), सुनील अर्जुन दांडेकर (वय ३५), चिमा गोविंद कुऱ्हाडा (वय ७५), नमिता विठठ्ल दांडेकर (वय १४), सारीका संतोष लाखात (वय ३८), आयुष्य सिताराम लाखात (वय १६), सागर नामदेव शेंडे (वय १५), वसंत शिवराम वळवी (वय ४०), सलोनी शिवराम वळवी (वय १२), अजय चंदर आहाडी (वय १९) आणि रियांशी संतोष लाखात (वय ४) सर्व राहणार बापूगाव यांचा समावेश आहे.

रामेश्वर नाईक, कक्ष प्रमुख मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष :

अपघातातील जखमींवर उपचार सुरू आहेत. डॉक्टरांचे पथक त्यांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे. मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाने जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून मदत वाटपाची प्रक्रिया जलद केली आहे. तसेच इतर आवश्यक प्रशासकीय कामेही प्राधान्याने पूर्ण केली जात आहेत.

७४ लाखांची दारू, प्रतिबंधित गुटखा साठा नष्ट

■भाईंदर। प्रतिनिधी,



मिरा-भाईंदर परिमंडळ १ च्या अधिनस्त असलेल्या काशिमीरा, काशिगाव, मिरारोड, नवघर, भाईंदर, उत्तन व नयानगर पोलिसांनी दारूबंदी १०० गुन्ह्यात जप्त केलेली ४,२४३ लिटर देशी, विदेशी व गावठी हातभट्टीची अशी एकूण किंमत १५ लाख ८३ हजार रुपये किमतीची दारू आणि महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधितीत असलेला गुटखा, पान मसाला, हुक्का यात एकूण ७५ गुन्हयांतील जप्त केलेला ५८ लाख १४ रुपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा मुद्देमाल असा एकूण ७४ लाखांचा मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशाने भाईंदर पश्चिमेच्या उत्तन कचरा प्रकल्पात त्यावर बुलडोझर फिरवून नष्ट करण्यात आला आहे.

शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार (एसओपी) ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात आली. विविध पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या कालखंडात दारूबंदी कायद्यांतर्गत दाखल झालेल्या एकूण १०० गुन्ह्यांमधील हा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. यामध्ये विविध नामांकित कंपन्यांच्या देशी व विदेशी मद्याच्या बाटल्यांचा समावेश होता. ही दारू सुरक्षित पद्धतीने बाटल्यांमधून बाहेर काढून पंचांसमक्ष जमिनीत ओतून नष्ट करण्यात आली.

मिरा- भाईंदरचे पोलीस उपायुक्त राहुल चव्हाण यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, सन २०२५ मध्ये पोलीस ठाण्यात अवैध दारूविरोधात तब्बल १०० यशस्वी कारवाई करण्यात आल्या होत्या. चालू वर्षातही ही मोहीम सातत्याने सुरू असून आगामी काळात अवैध दारूची वाहतूक, विक्री आणि साठवणूक करणार्यांविरोधात आणखी कठोर पावले उचलली जातील, असा स्पष्ट इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे व मिरा भाईंदर पोलीस उपायुक्त राहुल चव्हाण यांच्या आदेशानुसार सर्व पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईच्या वेळी अन्न औषध प्रशासनाचे अधिकारी व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका घनकचरा विभागाचे अधिकारी व त्यांचे पथक हे प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित होते.

पतीने पत्नीच्या डोक्यात टाकला चक्क गॅस सिलिंडर

पतीने ओलांडल्या क्रूरतेच्या सर्व सीमा!

■पुणे। प्रतिनिधी,

पुण्यात लेबर कॅम्पमध्ये चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीच्या डोक्यात ५ किलोचा गॅस सिलिंडर घालून तिची निर्घृण हत्या केली. हत्येनंतर आरोपी ने स्वतः पोलीस ठाण्यात जाऊन दिली गुन्ह्याची कबुली. त्यानंतर पोलिसानी ताबोडतोब तपास सुरू केला. पुण्यातील येवलेवाडी परिसरात काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली आहे. कौटुंबिक वाद आणि चारित्र्याच्या संशयावरून पती आणि पत्नी मध्ये झालं टोकाच भांडण. रागाच्या भरत पती ने पत्नी च्या डोक्यात टाकला ५ किलो वजनाचा सिलेंडर. ही घटना बांधकाम मजुरांच्या कॅम्पमध्ये (लेबर कॅम्प) घडली असून हत्येनंतर आरोपी पतीने स्वतःहून पोलीस ठाणे गाठत गुन्ह्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, आरोपी पती आणि मृत महिला येवलेवाडी परिसरातील एका बांधकाम प्रकल्पाच्या लेबर कॅम्पमध्ये वास्तव्यास होते. घटनेच्या दिवशीही दोघांमध्ये काही क्षुल्लक कारणांमुळे जोरदार भांडण झाले. या भांडणादरम्यान पतीचा राग अनावर झाला आणि त्याने घरात असलेला पाच किलोचा वजनाचा गॅस सिलिंडर उचलून पत्नीच्या डोक्यात घातला. हा वार इतका भीषण होता की, गंभीर दुखापत झाल्याने महिलेचा मृत्यू झाला. हत्येनंतर आरोपी स्वतः पोलीस ठाण्यात हजर आपल्या पत्नीची हत्या केल्यानंतर थेट जवळचे पोलीस ठाणे गाठले, केलेल्या गुन्ह्याची कबुलीही दिली. आरोपीने स्वतःहून गुन्ह्याची कबुली दिल्यामुळे पोलीसही आश्चर्य चकित झाले. पोलिसांनी तत्काळ त्याला ताब्यात घेतले असून त्याची कसून चौकशी सुरू आहे.

कारागृह अधिकाऱ्यांची जामिनावरील आरोपीसोबतच मद्यपार्टी

शासकीय नियमांची ऐशीतैशी

■नाशिक। प्रतिनिधी,



नाशिकरोड परिसरातील कारागृह अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाबाहेर रात्री उशिरापर्यंत मद्यपार्टी रंगल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे या पार्टीत एका संशयित आरोपीची उपस्थितीने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. कारागृहातील तीन वरिष्ठ तुरुंग अधिकारी चक्क फसवणुकीच्या गुन्ह्यातील एका कुख्यात आरोपीसोबत राजरोसपणे दारू पार्टी करत असल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

शासकीय नियमांची पुरती ऐशीतैशी करत या अधिकाऱ्यांनी चक्क कारागृह परिसरातील आपल्या निवासस्थानासमोरच मद्यपाटीर्चा आनंद घेतल्याने पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कारागृहाचे तिघे वरिष्ठ तुरुंग अधिकारी या व्हिडिओमध्ये आरोपीसोबत मद्य पाटीर्चा आनंद घेताना स्पष्ट दिसत आहेत. धकाकदायक म्हणजे आरोपी हा फसवणुकीच्या गुन्ह्यात याच नाशिकरोड कारागृहात दोन वेळेस शिक्षा भोगून सध्या जामिनावर बाहेर आहे. त्याचे नाव गौरव असल्याची माहिती आहे.

खरेतर कोणत्याही पोलीस किंवा कारागृह अधिकाऱ्याला आरोपीशी कुठल्याही प्रकारचे संबंध ठेवण्यास कायद्याने सक्त मनाई आहे. मात्र, या तिन्ही अधिकाऱ्यांनी सर्व नियम धाब्यावर बसवून, याच आरोपीच्या पैशांवर मद्याच्या सुरावटी उडवल्याचे प्राथमिक चौकशीत समोर येत आहे. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर नाशिकरोड परिसरात आणि पोलीस वतुर्ळात एकच खळबळ माजली असून अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

या संपूर्ण प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि एका वरिष्ठ अधिकारी याचा इतिहास आधीपासूनच डागांनी माखलेला आहे. यापूर्वी अनेकदा वरिष्ठांचे आदेश डावलल्यामुळे त्याला तब्बल तीन वेळा निलंबित करण्यात आलेले आहे. त्यांच्यावर यापूर्वी गंभीर गैरवर्तणुकीचे ठपके ठेवण्यात आले आहेत. एका प्रकरणात तर थेट आरोपीच्या पत्नीकडून आर्थिक फायदा लाटून आरोपीला मदत केल्याचा गंभीर आरोपही त्यांच्यावर सिद्ध झालेला आहे. तरीही, सुधारण्याची कोणतीही चिन्हे न दाखवता या अधिकाऱ्याने पुन्हा एकदा शासकीय जागेतच आरोपीसोबत मैफल जमवून कारागृह प्रशासनाची नाचक्की केल्याची चर्चा कारागृह रक्षकांमध्ये आहे. दरम्यान आता या तिन्ही अधिकाऱ्यांवर आता काय कारवाई होते, याकडे नाशिककरांचे लक्ष लागले आहे.

16 वर्षांनंतर पकडलेला आरोपी पुन्हा फरार... जेलऐवजी घरी नेल्याचा आरोप

■वसई। प्रतिनिधी,



वसई: वसईत एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, 16 वर्षांपूर्वीच्या खून प्रकरणातील आरोपी अविनाश उर्फ विनय उर्फ विनोद अजय लालताप्रसाद सोनी याला न्यायालयात हजर केल्यानंतर पुन्हा कारागृहात नेण्याऐवजी थेट घरी नेण्यात आल्याचा गंभीर आरोप झाला आहे; याचदरम्यान तो पोलिसांच्या ताब्यातून फरार झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेची गंभीर दखल घेण्यात आली असतानाच, आता आरोपीचा एक सीसीटीव्ही व्हिडीओ देखील समोर आला आहे, ज्यामुळे या प्रकरणाची चर्चा आणखी वाढली आहे. या संपूर्ण पलायन प्रकरणामुळे पोलीस प्रशासनात खळबळ उडाली असून, तपासात काही पोलीस कर्मचाऱ्यांचीच नावे समोर आल्यामुळे संशय बळावला आहे. अखेर या निष्काळजीपणा आणि संगनमताची मोठी किंमत मोजावी लागली असून, संबंधित काही पोलीस कर्मचारी आणि आरोपीच्या कुटुंबीयांवरही प्रशासनाकडून थेट कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

नेमके प्रकरण काय ?

अविनाश सोनी हा एप्रिल 2009 मध्ये नालासोपारा येथे घडलेल्या खून प्रकरणातील आरोपी होता. या घटनेनंतर तो तब्बल 16 वर्षे फरार होता. अनेक वर्षे पोलिसांना चकवा देणाऱ्या या आरोपीला अखेर मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयच्या क्राईम युनिट-3 ने डिसेंबर 2025 मध्ये मध्य प्रदेशातील महू येथून अटक केली होती. त्यानंतर न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली होती. दरम्यान, 18 मे रोजी आरोपीला ठाणे कारागृहातून वसई न्यायालयात सुनावणीसाठी आणण्यात आले होते. पोलीस शिपाई एकनाथ विष्णू तळपाडे, पोलीस शिपाई प्रशांत राठोड आणि पोलीस हवालदार वसीम अहमद जहीरुद्दीन शेख हे त्याला न्यायालयात घेऊन आले होते. सुनावणी पूर्ण झाल्यानंतर आरोपीला पुन्हा कारागृहात नेणे अपेक्षित होते. मात्र त्याला थेट त्याच्या घरी नेण्यात आल्याचा आरोप समोर आला आहे.

याचवेळी आरोपीने संधी साधत पोलिसांना चकवा दिला आणि तेथून पलायन केल्याचे समोर आले. त्यानंतर या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली. तपास सुरू असतानाच आरोपीचा सोसायटीतील लिफ्टमध्ये फिरतानाचा सीसीटीव्ही व्हिडीओ समोर आला. व्हिडीओमध्ये आरोपी आनंद व्यक्त करत हातवारे करत असल्याचे सांगितले जात आहे. हा व्हिडीओ समोर आल्यानंतर या घटनेची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

या प्रकरणात संबंधित तीन पोलीस कर्मचाऱ्यांविरोधात भारतीय न्याय संहितेतील कलम 262, 261, 249, 217, 264 (अ), 264 (ब), 61 (2) तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 अंतर्गत कलम 7 आणि 12 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला मदत केल्याचा संशय या कर्मचाऱ्यांवर व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणात आरोपीची पत्नी साक्षी अविनाश सोनी आणि मुलगा अतुल अविनाश सोनी यांनाही आरोपी करण्यात आले आहे. तीन पोलीस कर्मचारी, आरोपीची पत्नी आणि मुलगा अशा पाच जणांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

विशेष म्हणजे पोलीस शिपाई एकनाथ तळपाडे हे मूळ खून प्रकरणातील फियार्दी होते. मात्र आता त्यांच्यावरच आरोपीला मदत केल्याचा आरोप झाल्याने हे प्रकरण आणखी चर्चेत आले आहे. सध्या मुख्य आरोपी अविनाश सोनी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

आर्थिक आव्हानांचे राजकारण नको




भारतीय अर्थव्यवस्थेसमोर सद्यस्थितीत देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर काही मोठी आव्हाने आहेत. संयुक्त राष्ट्र तसेच आरबीआय आणि आर्थिक सर्वेक्षणाच्या ताज्या अहवालानुसार जागतिक भू-राजकीय तणाव आणि ऊर्जेचे संकट आहेच. तसेच कच्च्या तेलाचे वाढते दर पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे आणि ह्यरमुझ स्ट्रेट ऑफ हॉर्मुझह्णमधील अडथळ्यांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. भारत आपल्या गरजेच्या जवळपास ९० टक्के कच्चे तेल आयात करतो. तेलाच्या किमती वाढल्यामुळे भारताचा आयात खर्च प्रचंड वाढला असून देशांतर्गत महागाई वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. याशिवाय परकीय चलनाचे संतुलन आणि रुपयावरील वाढता दबाव हीसुद्धा चिंता आहेच. तेल आणि सोन्याच्या प्रचंड आयातीमुळे भारताची व्यापारी तूट वाढली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर परकीय गुंतवणूकदारांची माघार हा सर्वाधिक चिंतेचा विषय आहे. या माघारीमागील वस्तुस्थितीदर्शक कारणांचा शोध घेऊन त्याबाबत वेळीच उपाययोजना करण्याची गरज आहे. जागतिक अनिश्चिततेमुळे परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक काढून घेतल्याची चर्चा आहे. त्यामुळे डॉलरची मागणी वाढून भारतीय रुपयावर दबाव निर्माण झाला आहे. या दबावातून मार्ग काढण्यासाठी देशाच्या पंतप्रधानांनी सोने खरेदी थांबवणे, देशांतर्गत व्यापार व्यवहारावर भर दिला आहे. या शिवाय इंधनाच्या टंचाईविषयी ई वाहने वापरण्याचा सल्ला दिला आहे. हे दोन्ही विषय सामान्य किंवा कनिष्ठ मध्यमवर्गीय गटांसाठी गैरलागू आहेत. इलेक्ट्रिक वाहनांसाठी आवश्यक चार्जिंग स्टेशन्सची कमतरता तसेच गावखेड्यातल्या रस्त्यांची आणि वाहनांची वस्तुस्थिती लक्षात घेता हा सल्ला शहरवासीयांसाठीच असावा. भारतात सर्वाधिक असलेल्या कनिष्ठ मध्यमवर्गात सोन्याची खरेदी सणउत्सवात किंवा किरकोळ गुंतवणूक म्हणून केली जाते. आवडीनिवडीचा विषय नंतरच येतो. सोन्याची खरेदी करून गरजेच्या वेळी तारण ठेवून त्याचे रकमेत रुपांतर करण्यासाठी सोन्याची खरेदी केली जाते. अशा लोकांसाठी सोन्याची खरेदी ही नियमित बाब नसल्याने त्यांच्यासाठी हा सल्ला गैरलागू आहे. दुसरीकडे सद्यस्थितीतील सोन्याचे दर पाहता सोने खरेदीवर असेही नियंत्रणच येणार आहे. सर्वसामान्यांसमोर खरे आव्हान वाढत्या महागाईचे आहे. किरकोळ महागाई नियंत्रणात असली, तरी घाऊक महागाई अंशतः वाढली आहे. इंधन दरवाढीचा पेच आहेच, त्याशिवाय यंदा पावसाचे प्रमाणही कमी असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केल्यावर महाराष्ट्र राज्यासमोरील आव्हान आणखी कठीण होण्याची शक्यता आहे. यात शेतकरी आणि नोकरदार असलेला सामान्य माणूसही भरडला जाणार आहे. वाहतूक खर्च आणि लॉजिस्टिक खर्च वाढल्यामुळे जीवनावश्यक वस्तू आणि औद्योगिक कच्चा माल महाग होत आहे. ह्यएल निनोह्णच्या प्रभावामुळे मान्सूनवर परिणाम होण्याची शक्यता आहेच. अनपेक्षित हवामान बदल आणि उन्हाळ्यातील वाढते तापमान यामुळे रब्बी आणि उन्हाळी पिकांच्या उत्पादनावरील विपरीत परिणाम टाळता येणार नाही, त्यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला कमालीचा फटका बसणार आहे. कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूच्या देशांतर्गत उत्पादनात सलग काही महिने घट नोंदवली गेल्याने साहजिकच इंधनदरवाढीचा फटका शेती उद्योगाला आतापासूनच बसू लागला आहे. डिझेलसाठी शेतकर्यांच्या पेट्रोल पंपावरील रांगा कमी होण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजनेची गरज आहे. खरीपाच्या तयारीसाठी मशागतीच्या कामांमध्ये ट्रॅक्टरचा वापर गरजाचा असताना डिझेलटंचाईमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. कृषी क्षेत्रात अशी परिस्थिती असताना खासगी गुंतवणूक आणि उद्योग क्षेत्रातही तेजी नाही. सरकारी पायाभूत सुविधांवरील खर्च उत्तम असला तरी खासगी क्षेत्राकडून होणारी मोठी गुंतवणूक अजूनही अपेक्षेपेक्षा कमी आहे. खासगी क्षेत्राचा सरकारवरील उडालेला विश्वास हे याला प्रमुख कारण आहे. देशासमोर आर्थिक आव्हानाविषयी सरकारकडून ठोस कृती कार्यक्रम जाहीर करण्याची गरज आहे. त्यासाठी आर्थिक वस्तुस्थिती स्पष्ट करण्याचीही गरज आहे. राज्यातील विविध भागात इंधन टंचाईचे चित्र स्पष्ट दिसत असताना अजूनही त्याविषयी पुरेसे स्पष्टीकरण किंवा दिलासा देणारे आश्वासन मिळालेले नाही. वर्तमानातली हतबलता आणि भविष्याविषयीच्या साशंकतेने नागरिकांना पुरते घेरले आहे. या सर्वच आव्हानाचा परिणाम रोजगारावरही होण्याची भीती आहे. सेवा आणि उत्पादन क्षेत्रातील नोकर्या टिकवण्याची गरज आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांना दिलासा मिळण्याची गरज आहे. अशा परिस्थितीवर मात करण्यासाठी भारताकडे परकीय चलनाचा पुरेसा साठा असल्याचे सरकारकडून सांगितले जात आहे. ही जमेची बाजू लक्षात घेता आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवरील तणावाला बळी न पडता ह्यतटस्थताह्ण जपण्याचे आव्हान भारतीय रिझर्व्ह बँकेसमोर आहे. आरबीआयने या आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी आखलेल्या मार्गदर्शक धोरणानुसार परकीय गुंतवणूक वाढवण्यासाठी भारत सरकारला इथे व्यापार, उद्योगाला पोषक असे विश्वासार्ह वातावरण निर्माण करावे लागेल. त्यासाठी सरकार, विरोधकांनीही या आर्थिक आव्हानांचा ह्यराजकीय टूलह्ण म्हणून विचार आणि वापर करण्यापेक्षा या संकटातून देशाला बाहेर काढण्यासाठी एकदिलाने प्रयत्न करण्याची गरज आहे. कारण दोन्ही बाजू आपापल्या राजकीय पोळ्या भाजण्याच्या नादात सामान्य लोकांना भेडसावणारे प्रश्न बाजूला राहतात. दोन्ही बाजूंच्या आरोपप्रत्यारोपांच्या वादळाचा धुरळा इतका वाढतो आणि त्याची प्रसारमाध्यमांवर इतकी चर्चा होते की, गरजू शेतकर्यांचे प्रश्न दूर फेकले जातात. प्रश्नांचे उत्तर सापडण्यापेक्षा राजकीय वाद आणि वादंग जास्त रंगतो. आणि सामान्य माणसांचे जीवन बेरंग होऊन जाते.

येथे कित्येक गेले, गणती नाही

आज मुंबई-अहमदाबाद महामार्ग हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा असला तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने तो गंभीर आव्हान बनला आहे. माणसाच्या विकासासाठी निर्माण केलेले हे महामार्ग माणसालाच मृत्यू किंवा अपंगत्वापर्यंत नेण्याचे महाकारण बनत आहेत. गेल्या काही वर्षांतच या मार्गावर अनेकांनी आपले जीव गमावले आहेत. चार दिवस या अपघातांची चर्चा होते, त्यानंतर परिस्थिती ह्यजैसे थेह्णच असते. पुन्हा काही दिवसांनी तीच भीषणता समोर येते. जीवितहानी टाळण्यासाठी याकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

तारीख 18 मे 2026. सायंकाळचे साधारण 4 वाजलेले. पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्याच्या हद्दीत असलेल्या मुंबई-अहमदाबाद महामार्गावर पुन्हा एकदा हाहाःकार उडाला. किंकाळ्या, आक्रोश, पराकोटीच्या यातना, दुःख-सारंच पाहायला मिळालं. डहाणू तालुक्यातील धानिवरी परिसरात मुंबई-अहमदाबाद महामार्गावर झालेला हा अपघात अत्यंत भीषण आणि हृदयद्रावक होता. या दुर्घटनेत साखरपुडा समारंभासाठी जात असलेल्या वर्हाडींना घेऊन जाणार्या ट्रकची कंटेनर ट्रकशी जोरदार धडक झाली. या अपघातात 13 जणांचा जागीच मृत्यू झाला, तर 17 जण गंभीर जखमी झाले. मुंबई-अहमदाबाद महामागार्साठी हा अपघात नवीन नव्हता. या मागार्ने आतापर्यंत कित्येक किंकाळ्या, मानवी शरीराच्या उडर्णाया चिंधड्या, रक्त आणि आक्रोश पाहिलेला आहे.

याआधी राष्ट्रीय महामार्ग 8 म्हणून ओळखला जाणारा आणि आताचा राष्ट्रीय महामार्ग 48 असणारा मुंबई-अहमदाबाद महामार्ग हा भारतातील सर्वात महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गांपैकी एक आहे. हा महामार्ग मुंबई, ठाणे, पालघर, वापी, सूरत, वडोदरा आणि अहमदाबाद यांसारख्या महत्त्वाच्या शहरांना जोडतो. या मार्गाच्या विकासाची सुरुवात स्वातंत्र्यानंतरच्या काळात झाली. सुरुवातीला हा दोन पदरी राष्ट्रीय महामार्ग होता. मात्र 1980 आणि 1990 च्या दशकात मुंबई-गुजरात दरम्यान औद्योगिक आणि व्यापारी वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढू लागली. त्यामुळे केंद्र सरकारने हा रस्ता रुंद करण्याचा निर्णय घेतला.



मुंबई-अहमदाबाद मार्गाचे आधुनिक पद्धतीने बांधकाम मुख्यतः 2000 नंतर वेगाने सुरू झाले. 2009 ते 2013 दरम्यान महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये हा महामार्ग चार लेनवरून सहा लेन करण्यात आला. विशेषतः पालघर आणि वसई-विरार परिसरातील वाहतूक लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्यात आला. या महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू झाली. गुजरात-महाराष्ट्र या दोन महत्त्वाच्या राज्यांदरम्यानच्या व्यापारी मालाची मोठ्या प्रमाणात वाहतूक याच मार्गावरून होत असते. त्यामुळे या महामार्गावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहने धावू लागली. त्याशिवाय इतर वाहनांचा सुस्साट प्रवास हा होताच.

एकीकडे सुस्साट गाड्या धावर्णाया महामागार्मुळे प्रवाशांचे जीवन जलद झाले असले तरी मोठ्या प्रमाणात प्रवाशांच्या आयुष्याला कायमचा ब्रेक लागला, तर काही कायमस्वरूपी अंथरुणाला खिळले. वाहनचालकांची वैयक्तिक चूक आणि त्या जोडीला असलेली रस्ता-सुरक्षेची दयनीय अवस्था अशा मोठ्या त्रुटींमुळे या महामागार्ला मोठ्या प्रमाणात अपघातांचे ग्रहण लागले. हे ग्रहण अगदी आतापर्यंतच्या धानिवरी अपघातापर्यंत सुटलेले नाही. प्रत्येक महिन्याला या मार्गावर अपघात हा होतोच होतो, एवढी गंभीर परिस्थिती आहे. धानिवरी अपघाताच्या काही दिवस आधीच, अगदी मे 2026 मध्येच या महामार्गावर सुमारे 18 कोटी रुपयांच्या चांदीच्या विटा वाहून नेर्णाया वाहनाचा अपघात झाला. अपघातानंतर चांदीच्या विटा रस्त्यावर विखुरल्या गेल्याने पोलिसांना मोठा बंदोबस्त करावा लागला. महामार्गावरील तलासरी, चारोटी, मनोर, वसई आणि विरार परिसर हे अपघातप्रवण झाले आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी कंटेनर, टँकर आणि खासगी बस यांच्या धडकांमुळे गंभीर दुर्घटना आतापर्यंत झालेल्या आहेत.

पाच वर्षांचा आढावा घ्यायचा झालाच तर फेब्रुवारी 2023 मध्ये डहाणू तालुक्यातील चारोटी परिसरात एका कारची लक्झरी बसशी समोरासमोर धडक झाली होती. या अपघातात कारमधील चारजणांचा जागीच मृत्यू झाला. धडक इतकी मोठी होती की कारचा पूर्ण पुढील भाग चिरडला गेला होता. त्याच महिन्यात चारोटी परिसरात आणखी एक भीषण अपघात झाला. तीन युवक एका दुचाकीवर प्रवास करत असताना भरधाव ट्रकने त्यांना धडक दिली. तिघांचाही जागीच मृत्यू झाला. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील सर्वाधिक चर्चेत राहिलेला अपघात म्हणजे उद्योगपती सायरस मिस्त्री यांचा 2022 मधील मृत्यू होय. पालघरजवळील चारोटी परिसरात त्यांच्या कारचा अपघात झाला होता. या दुर्घटनेत सायरस मिस्त्री आणि त्यांच्यासोबत असलेले जहांगीर पंडोले यांचा मृत्यू झाला.

एका डेटानुसार, 2025 मध्ये जानेवारी ते जून या सहा महिन्यांतच मुंबई-अहमदाबाद महामार्गावर 50 हून अधिक गंभीर अपघात झाले आणि 30 पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला. अपघातांची मोठी संख्या तर आहेच, शिवाय वाहतूक कोंडीची मोठी समस्या या मार्गावर आहे. 2025 मध्ये वाहतूक कोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकेमुळे एका 16 महिन्यांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटनादेखील समोर आली. रस्ते दुरुस्तीमुळे झालेल्या प्रचंड ट्रॅफिकमुळे रुग्णालयात पोहोचण्यास मुलाला उशीर झाला होता. या घटनेने महामार्गावरील वाहतूक व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. ही माहिती आहे गेल्या काही वर्षांची. त्याआधी या महामार्गावर कित्येक जणांचे बळी गेले असतील याची गणती नाही.

या अपघातांमागे अनेक कारणे जबाबदार असल्याचे दिसून येते. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे अतिवेग. मुंबई-अहमदाबाद महामार्ग हा रुंद आणि सरळ असल्यामुळे अनेक चालक वेगमयार्देपेक्षा जास्त वेगाने वाहने चालवतात. विशेषतः रात्रीच्या वेळी ट्रक आणि लक्झरी कार चालकांचे वेगावर नियंत्रण राहत नाही. अतिवेगामुळे अचानक ब्रेक लावल्यास वाहनावर नियंत्रण सुटते आणि भीषण अपघात होतात. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे चुकीच्या दिशेने वाहन चालवणे. अनेक ठिकाणी स्थानिक वाहनचालक वेळ वाचवण्यासाठी, तसेच रस्त्याची कामे सुरू असल्याने वाहने चुकीच्या दिशेने महामार्गावर प्रवेश करतात. धानिवरी येथील भीषण अपघातानंतर या समस्येवर मोठी चर्चा होत आहे. शॉर्टकट घेण्याच्या प्रयत्नात वाहनचालक जीव धोक्यात घालतात. विशेषतः सेवा रस्ते नसलेल्या भागांत ही समस्या अधिक गंभीर आहे.

ट्रक आणि कंटेनर चालकांचा थकवा हेदेखील मोठे कारण आहे. मुंबई-अहमदाबाद मार्ग हा मालवाहतुकीचा मुख्य मार्ग असल्याने हजारो ट्रक दिवस-रात्र या मार्गावर धावत असतात. अनेक चालक सलग 10 ते 15 तास वाहन चालवतात. झोपेचा अभाव, शारीरिक थकवा आणि ताण यामुळे चालकांना डुलकी लागते किंवा सावरण्यास उशीर होतो. त्यामुळे समोरचे वाहन वळणावर अचानक दिसल्यामुळे आतापर्यंत अनेक अपघात झाले आहेत. रस्त्यांची खराब स्थिती हे आणखी एक गंभीर कारण आहे. अनेक भागांत काँक्रिटीकरणाची कामे सुरू असल्यामुळे पयार्यी मार्ग, खड्डे आणि अरुंद लेन तयार होतात. काही ठिकाणी पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचते. अचानक रस्ता बदलल्याने चालक गोंधळतात आणि वाहनांवर नियंत्रण सुटते.

पालघर, चारोटी, मनोर आणि तलासरी परिसरात रस्त्यांच्या कामांमुळे वाहतूक कोंडी आणि अपघात वारंवार घडल्याच्या घटना घडल्या आहेत. याशिवाय अपुरी प्रकाशयोजना ही देखील मोठी समस्या आहे. रात्रीच्या वेळी महामार्गावरील अनेक भाग अंधारात असतात. खराब स्ट्रीटलाइट्स, अस्पष्ट दिशादर्शक फलक आणि परावर्तक नसल्याने चालकांना समोरील परिस्थिती योग्यवेळी दिसत नाही. विशेषतः पावसाळ्यात दृश्यमानता कमी झाल्यास धोका अधिक वाढतो. याशिवाय वाहतुकीची प्रचंड गर्दी, बेकायदेशीर प्रवासी वाहतूक, हे देखील गंभीर कारण आहे. अनेकदा मालवाहू ट्रक किंवा टेम्पोमधून मोठ्या प्रमाणावर प्रवासी वाहतूक केली जाते.

धानिवरी अपघातातही वर्हाडींनी भरलेल्या मालवाहू वाहनाचा समावेश होता. अशा वाहनांमध्ये सुरक्षा साधने नसतात. सीटबेल्ट, योग्य आसनव्यवस्था किंवा आपत्कालीन बाहेर पडण्याची व्यवस्था नसल्याने अपघातात मृत्यूचे प्रमाण वाढते. याशिवाय वाहतूक नियमांचे अपुरे पालन आणि कमकुवत अंमलबजावणी ही देखील महत्त्वाची समस्या आहे. अनेक चालक सीटबेल्ट वापरत नाहीत, मोबाईलवर बोलत वाहन चालवतात किंवा मद्यपान करून वाहन चालवतात. काही वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त माल भरला जातो. यामुळेही वाहनांचा तोल बिघडतो. याशिवाय या मार्गाच्या दोन्ही बाजूंनी गावे आहेत. काही ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना त्या त्या गावातील ग्रामस्थांची शेती आहे. अनेक वेळा मार्ग पार करण्यासाठी पुलाची उपलब्धता नसल्यामुळे हा महामार्ग पार करताना अनेक जणांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

आज मुंबई-अहमदाबाद महामार्ग हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा असला तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने तो गंभीर आव्हान बनला आहे. माणसाच्या विकासासाठी निर्माण केलेले हे महामार्ग माणसालाच मृत्यू किंवा अपंगत्वापर्यंत नेण्याचे महाकारण बनत आहेत. गेल्या काही वर्षांतच या मार्गावर अनेकांनी आपले जीव गमावले आहेत. चार दिवस या अपघातांची चर्चा होते, त्यानंतर परिस्थिती 'जैसे थे'च असते. पुन्हा काही दिवसांनी पुन्हा तीच भीषणता समोर येते. अशा जलद मार्गांवर अपघातांची संख्या शून्यापर्यंत आणणे शक्य नसले तरीही, अपघात कमीत कमी व्हावेत आणि जीवितहानी जास्तीत जास्त कशी टाळता येईल, याकडे लक्ष देणं गरजेचं आहे. तज्ज्ञांच्या मते, सीसीटीव्ही निरीक्षण, वेग नियंत्रण, अधिक सेवा रस्ते, चालक प्रशिक्षण आणि कठोर अंमलबजावणीशिवाय या महामार्गावरील अपघात कमी होणे कठीण आहे.

आमदारसाहेब सभागृहात हाजीर तो हो!



आमदारांना सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्यापासून रोखण्याचा प्रयत्न होऊ नये, त्यांच्या उपस्थित राहण्याला अडथळा आणला जाऊ नये म्हणून तर विशेषाधिकार आले. पण काहींचे म्हणणे असे दिसतेय की तिथे बोलले म्हणजे काही परिणाम होतो का? मग विषयच संपला.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची विधान परिषद सदस्यत्वाची मुदत संपता संपता त्यांच्या सभागृहातल्या अत्यंत कमी उपस्थितीबाबतचे वृत्त आले. त्याला ठळक प्रसिद्धीही मिळाली. एकूणच विधिमंडळ सदस्यांच्या उपस्थितीचा विषय गंभीर आहे. दुसरीकडे सरकार काटकसरीसाठी अनेक उपाययोजना करत आहे. मंत्रीमंडळ बैठकीला ऑनलाईन उपस्थिती नोंदवता येईल, असे सांगण्यात आले आहे. याचे परिणाम काय होतील, यावर चर्चा व्हायला हवी.

आपल्या व्यवस्थेत दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एक, मंत्रीमंडळ बैठकीशिवाय मंत्र्यांसाठी काहीही महत्त्वाचे असू शकत नाही. अगदीच काही मोठी घटना घडली असेल आणि तिथे मंत्री उपस्थित असणे गरजेचे असेल तर तो अपवाद. दुसरे, विधिमंडळाचे सत्र सुरू असताना आमदारांची उपस्थिती अनिवार्य असतेच. फार अपवादात्मक प्रसंगी पीठासीन अधिकाऱ्यांना लेखी कळवून ते गैरहजर राहू शकतात.

स्व. शंकरराव चव्हाण हेडमास्तर मुख्यमंत्री म्हणून ओळखले जात. एकदा मंत्रीमंडळ बैठक असतानाही मुख्यमंत्री कार्यालयात पत्र देऊन एक राज्यमंत्री परस्पर गावी निघाले तेव्हा त्यांना मनमाड जंक्शनहून परत बोलावले गेल्याचे उदाहरण मागे याच सदरातून दिलेले आहे. मंत्रीमंडळ बैठकी वेळेला जे मंत्री बैठक सभागृहात पोहोचले तेच आत असत. त्यानंतर आलेले बाहेर थांबत कारण मुख्यमंत्री चव्हाण सभागृहाचे दरवाजे आतून बंद करून घ्या असे आदेश देत. उशीरा आलेल्यांची फार पंचाईत होत असे हे सांगायला नको.

मंत्रीमंडळ बैठकीला कोण कितीवेळा उपस्थित राहिले आणि गैरहजर राहिलेले नेमके कोणत्या कारणासाठी आले नव्हते याचा तपशील उघड होत गेला तर लोकशाही व्यवस्थेसाठी ते उपकृत ठरेल. पण तसे अभावानेच होते. कारण लोकाभिमुखतेपेक्षा राजकारण प्रभावी ठरू लागले आहे. मंत्रीमंडळाच्या बैठकीला कोरम नसतो. त्यामुळे बैठकीच्या अध्यक्षस्थानची व्यक्ती सोडून बाकी कोणी उपस्थित राहिले नाही तरी बैठक पार पडू शकते आणि तो निर्णय अंमलात आणला जाऊ शकतो. कदाचित या कारणाने मंत्र्यांच्या गैरहजेरीची चर्चा फारशी होत नसावी.

पण मंत्र्यांना ऑनलाईन उपस्थितीची सूट दिल्यामुळे ते मंत्रालयाकडे फिरकणारच नाहीत, अशी भीती व्यक्त केली जाऊ लागली आहे. मागील दोनेक दशकांत मंत्रालयातील मंत्र्यांची उपस्थिती रोडावत गेल्याचे दिसून येते. पूर्वी सोमवार ते गुरुवार या कालावधीत मंत्री हमखास मंत्रालयात असत. नंतर मंगळवार ते गुरुवार असे चक्र सुरू झाले. त्यानंतर मंत्रीमंडळ बैठकीचा आणि फारतर दुसरा दिवस अशी उपस्थिती दिसू लागली. पुढे पुढे तर केवळ मंत्रीमंडळ बैठकीच्या दिवशी काही मंत्री मंत्रालयात दिसू लागले.

मंत्री म्हणून शासकीय कामकाज घरूनही पार पाडले जाऊ शकते, अशी धारणा पक्की झाली. मग अधिकारी फायली आणि कागदपत्रांचे बाड घेऊन सूचना व आदेश प्राप्त करण्यासाठी मंत्री महोदयांच्या बंगल्यावर जाताना दिसू लागले. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेली मंडळीही मंत्र्यांच्या बंगल्याकडे जाऊ लागली. सर्वच बंगले मंत्रालय परिसरात नाहीत. त्यामुळे पदरमोड करून मलबार हिलला जाणे भाग पडू लागले. बैठकाही सह्याद्री अतिथीगृहात सुरू झाल्या. तिथे तर सर्वसामान्यांना किंवा ज्याचा बैठकीशी संबंध नाही त्यांना प्रवेश मिळत नाही.

जे बैठकीसाठी जातात ते अधिकारीही सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने थोडेच जाणार. तेव्हा बऱ्याच शासकीय गाड्या मलबार हिलच्या दिशेने जाताना इंधनही जाळणारच. मग काटकसर कशी होणार हा प्रश्न मात्र इथे गौण ठरतो. एक काळ असा होता की मंत्रालयात सायंकाळी ७-८ वाजेपर्यंत मंत्री आपल्या दालनात लोकांना भेटत आहेत असे दृष्य दिसत असे. मंत्री दालनात आहेत तेव्हा न जाणो काही तातडीचा विषय उपस्थित होईल म्हणून सचिव, उपसचिव मंत्रालयात थांबत. पुढे मंत्री असले तरी काय होते पण मुख्यमंत्री मंत्रालयात आहेत म्हणून अधिकारी थांबून राहू लागले.

आता स्मार्टफोनमुळे सारे सोपे झाले आहे. कागदपत्रे, विचारांची देवाण-घेवाण फोनद्वारे होते. आदेश निघतात, फॉरवर्ड केले जातात. चेहराविरहित व्यवस्था सुरू आहे. सामान्य माणसांपैकी ज्यांच्या फोनवर प्रतिसाद येतो त्याचे ठीक आहे पण ज्याचा नंबर समोरच्याच्या फोनमध्ये नाही किंवा तो दखल घेण्याजोगा आहे, असे वाटत नाही, त्याचे काय होणार हा प्रश्न उरतो. मंत्रालयात जसे मंत्री व वरिष्ठ अधिकारी यांचे उपस्थित असणे अभिप्रेत आहे तसेच ते विधिमंडळात आमदारांबाबत आहे.

खा. नारायण राणे विरोधी पक्षनेते असताना दर तासाला आमदारांच्या उपस्थितीची नोंद घेतली जाई. राणे सभागृहात असोत वा नसोत शिवसेनेचे आमदार मात्र तिथे दिसत. सत्ताधारी बाकांवरून जरा काही शेरेबाजी झाली अथवा दखल घेण्यासारखा विषय असला की विरोधी बाकावरचे आमदार तयारच असत. तेव्हा भाजपाकडून कोणी असो वा नसो पण विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सुधीर मुनगंटीवार हे दोन सदस्य तरी हमखास दिसत. साधारणपणे अर्धा तास चर्चा हा संबंधित आमदार व त्याला उत्तर द्यावे लागते म्हणून त्या खात्याचा मंत्री या दोघांचाच जिव्हाळ्याचा विषय मानला जातो. अनेकदा रात्री उशीरा अर्धा तास चर्चेसाठी विरोधी बाकावर फडणवीस आणि मुनगंटीवार व समोर एक-दोन मंत्री व काही तुरळक संख्येने सदस्य एवढेच सभागृहात दिसत.

पुढे परिस्थिती आणखीनच बदलत गेली. जवळपास प्रत्येक दालनात थेट प्रक्षेपण पाहण्याची सोय झाली. तेव्हा सभागृहात बसून राहण्याची गरज संपली. तसेच आपला विषय मांडून झाला आहे तर सभागृहात कशाला बसून रहा म्हणून बाहेर निघून जाण्याचा शिरस्ता पडला. अंबादास दानवे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते होते तेव्हा उद्धव ठाकरे तिथे बसलेले दिसत. ते सभागृहात फार वेळ का बसत नाहीत, असे त्यांच्या निकटवर्तीयांला विचारले तर ते म्हणत आत काय सुरू असते तुम्ही पाहता ना? विरोधी बाकांवरील किती जणांना बोलू दिले जाते ? बोलले तरी सत्तापक्ष त्याची दखल घेतो का ?

सभागृह कामकाजाच्या परंपरा व शिस्त यानुसार मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते जेव्हा जेव्हा सभागृहात उपस्थित असतात तेव्हा दोन्ही बाजूंकडील सदस्यांची उपस्थिती लक्षणीय असे. ते एखाद्या महत्त्वाच्या विषयावर अथवा चर्चेला उत्तर किंवा सुरूवात करणार असतील तर सभागृहात फारच कमी आसने रिकामी दिसत. शिवाय ते बोलताना अडथळे आणले जात नसत. तसेच सत्ताधारी अथवा विरोधी बाकावरील ज्येष्ठ अनुभवी सदस्य बोलायला उठले तर सर्व मंत्री, सदस्य त्या दिशेने कान टवकारत. गणपतराव देशमुख, बी. टी. देशमुख यांच्यासारख्या सदस्यांनी बोलण्यासाठी हात वर केला तर तत्क्षणी त्यांना बोलू दिले जाई व मुख्यमंत्र्यांसकट सर्वजण त्यांचे बोलणे नीट ऐकत.

आता तसे का होत नाही म्हटले तर प्रतीप्रश्न येतो की आता कोणी तसे आहे का? आता अनेकदा निवडून आलेले सदस्यही सभागृहात आहेत. पण असा प्रश्न उपस्थित व्हावा ही वेळ का आली? आमदारांना सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्यापासून रोखण्याचा प्रयत्न होऊ नये, त्यांच्या उपस्थित राहण्याला अडथळा आणला जाऊ नये म्हणून तर विशेषाधिकार आले. पण काहींचे म्हणणे असे दिसतेय की तिथे बोलले म्हणजे काय होते ? काही परिणाम होतो का? मग विषयच संपला.

या जरा चौथ्या सीटवर!

पंतप्रधानांनी काटकसरीचे व इंधनबचतीचे आवाहन केल्यावर सर्व महनीय व्यक्तींनी देशाच्या आर्थिक राजधानीत आपल्या खासगी आलिशान प्रवासाला सोडचिठ्ठी देत सर्वसामान्य प्रवासी होण्याचे दर्शन घडविले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुलेटवरून विधिमंडळात आले, त्याचीही भरपूर चर्चा रंगली. याच मालिकेत मुंबईच्या प्रथम नागरिक महापौर रितू तावडे यांनी घाटकोपर ते दादर असा एसी लोकलचा प्रवास केला आणि मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी बेस्ट बसने प्रवास केला. याच दरम्यान ताफ्यातील बेस्टची इलेक्ट्रिक बस बिघडली, कर्मचाऱ्यांना धक्का मारून तिला बाजूला करावे लागले व या दुरुस्तीचक्रात त्यांचा २० मिनिटे खोळंबा झाला. बेस्टचे नेमके दुखणे काय आहे, त्याचा दाहक अनुभव महापौरांना या वेळी आला असणार. पंतप्रधानांच्या आवाहनामुळे का होईना, मुख्यमंत्री, महापौर यांना सर्वसामान्यांच्या रोजच्या विवंचनांची जाणीव होणार असेल, तर चांगलेच आहे. 'पण साहेब,..तुमच्या अधिकाऱ्यांनाही सांगा की, जरा आमच्यासह चौथ्या सीटवरून प्रवास करून बघाच, तरच कळतील आमच्या व्यथा,' अशी सर्वसामान्यांची भावना आहे. करोनानंतर आता सेकंड क्लासमध्येही चौथ्या सीटचा आग्रह कुणी धरत नाही; परंतु लोकलगाड्यांचे प्रश्न अजिबात सुटलेले नाहीत. रेल्वेपासून रिक्षांपर्यंत सर्वांना वक्तशीरपणा आणि शिस्तीचे वावडे आहे. यापूर्वी एकदा काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी मुंबईभेटीत लोकलने प्रवास केला होता. त्या वेळी राज्यात काँग्रेस सत्तेवर होती. मात्र, तरीही येथील रेल्वेप्रवाशांच्या यातना कमी झाल्याच नाहीत. जुन्या मुंबई-पुणे रस्त्याची आठ-दहा तासांची कोंडी अनुभवल्यामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी द्रुतगती महामार्ग उभारण्याची सूचना केली होती, तर मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडीचा फटका बसल्यावर शरद पवार यांनी नाशिकला दुहेरी घाटमार्ग तयार करण्याचे निर्देश दिले होते. या गोष्टींच्या आठवणी अनेकदा सांगितल्या जातात. याचा अर्थ नेतेमंडळी कोंडीत अडकल्यावरच महामार्ग किंवा वाहतूकसुविधा तयार होणार का? काही वर्षांपूर्वी एका तरुण पत्रकाराला बोरिवली-दहिसर चेकनाक्याजवळ दुचाकी अपघाताला सामोरे जावे लागले होते. एमएमआरडीएमधील एका धडाकेबाज सनदी अधिकाऱ्यांनी त्याची विचारपूस केल्यावर सल्ला दिला, की मुंबईत दुचाकी वापरणे अत्यंत धोकादायक असते, तुम्ही ती वापरताच कशाला? त्यावर सदर पत्रकार अवाक झाला. हद्दीच्या वादामुळे चेकनाक्यावर एकही रिक्षा मिळत नाही, त्यामुळे इतक्या कमी अंतरावर स्वस्तातला पर्याय दुचाकीचाच राहतो, ही वस्तुस्थिती त्याने कथन केली. याचा अर्थ वाहतूकसुविधांचे नियोजन करणाऱ्या अधिकाऱ्याला प्रत्यक्षात काय घडते, याचा मागमूसही नव्हता. मुंबईत नवनव्या वाहतूकसुविधांची भर पडत आहे. मात्र बेस्ट व लोकलसेवा या मुंबईवाहतुकीचा कणा असलेल्या साधनांच्या दैनंदिन परिचालनाविषयी मात्र हेळसांड सुरू आहे. सेवेचा निमार्ता जोपर्यंत स्वतः वापरकर्ता होत नाही, तोपर्यंत व्यवस्थेतील यातनांवर तोडगा काढ

स्वादासह आरोग्यासाठीही फायदेशीर ठरते पनीर

पनीरची भाजी म्हटलं की सगळ्यांच्याच तोंडाला पाणी सुटतं. पनीर आवडत नाही अशा व्यक्ती विरळाच. हल्ली तर पनीर हा सगळ्यांच्याच घरचा अविभाज्य भाग झाला आहे. पनीर हा कॅल्शियमचा चांगला स्त्रोत मानला जातो. पनीर खाण्यात जितका स्वादिष्ट आहे तितकाच आपल्या आरोग्यासाठीही त्याचा फायदा होत असतो याची तुम्हाला कल्पना आहे का? पनीरपासून शरीराला फायदे होतात. दुधापासून बनणारा हा पनीर आपण वेगवेगळ्या स्वरूपात वापरतो. पनीरच्या विविध भाज्या बनवतो. त्याशिवाय यापासून मिठाईदेखील बनवली जाते. पनीरमध्ये अधिक प्रमाणात कॅल्शियम, प्रोटीन, विटामिन आणि फॉस्फरस आढळतं, ज्यामुळे दात आणि आपली हाडं मजबूत बनवण्यासाठी याचा उपयोग होतो. पनीरचे नक्की कोणकोणते फायदे आहेत ते आपण या लेखातून पाहणार आहोत. चला तर मग जाणून घेऊया पनीरचे आरोग्याला होणारे खास फायदे –

१. कॅन्सर असल्यास, फायदेशीर ठरतो पनीर

हल्ली कॅन्सरचं प्रमाणही वाढलेलं दिसून येत आहे. दुधापासून बनलेला पनीर हा कॅन्सरसारख्या गंभीर आजारामध्ये फायदेशीर ठरतो. पनीरमध्ये भरपूर प्रमाणात प्रोटीन असतं, जे ब्रेस्ट कॅन्सरसारख्या गंभीर आजापासून वाचण्यासाठी मदत करतं. त्यामुळे आपल्या जेवणात नेहमी पनीरचा समावेश करून घ्या. पनीर आवडत असेल वा नसेल याचा उपयोग आपलं आरोग्य निरोगी राहण्यासाठी नक्कीच करून घ्यायला हवा.

२. सांधेदुखीसाठीही पनीरची होते मदत

शरीराला योग्य पोषण न मिळाल्यास, शरीर कमकुवत होते. त्यामुळे शरीरात सांधेदुखीसारखे आजार बळावतात. ही सांधेदुखी कधी मोठ्या प्रमाणात सुरू होते आणि शरीरात त्याच्या कधी गाठी होतात याचा पत्ताही लागत नाही. यापासून वाचण्यासाठी नियमित आहारात पनीरचा समावेश करून घ्यायला हवा. यातील कॅल्शियम शरीराला सांधेदुखीपासून दूर राखण्यास मदत करतात. पनीरमध्ये शरीराला मिळणारी आवश्यक पोषक तत्व असतात. जे आजारापासून दूर राहण्यासा मदत करतात.

३. रक्तदाब नियंत्रणात आणण्यासाठी

आजकालच्या धावपळीच्या आयुष्यामध्ये बऱ्याचदा आपल्याला जेवणाच्या वेळा नीट सांभाळताना कष्ट घ्यावे लागतात. कामाच्या गडबडीत जेवणाची वेळ नेहमीच टळून जाते. त्यामुळे फारच कमी वयात रक्तदाब आणि मधुमेहासारखे आजार बळावतात. त्यामुळे अशा रूग्णांना नेहमीच आपल्या जेवणाची वेळ आणि खाण्याच्या गोष्टींकडे विशेष लक्ष देणं गरजेचं असतं. पनीर खाल्ल्याने तुम्ही तुमचा रक्तदाब आणि मधुमेह दोन्ही नियंत्रणात आणू शकता. पनीरमुळे शरीरातील साखरेची पातळी ही प्रमाणात राहण्यास मदत करते. त्यामुळे डॉक्टरही तुम्हाला अशावेळी पनीर खाण्याचा सल्ला देतात. तेलकट नाहीतर योग्य प्रमाणात भाजी करून याचा आपल्या जेवणात समावेश करून घेतल्यास, निरोगी शरीरासाठी पनीरचा नक्कीच फायदा होतो.

४. स्नायू बनवण्यासाठी फायदेशीर

आजकाल शरीराचे स्नायू बळकट करण्यावर आणि जिमला जाण्यावर खूपच जण भर देत असतात. तुम्हाला जर तुमचे स्नायू अधिक बळकट करायचे असतील तर पनीरचा वापर करा. कारण स्नायू अर्थात मसल्स बनवण्यासाठी शरीरामध्ये जास्त प्रमाणात प्रोटीनची आवश्यकता असते आणि हे प्रोटीन तुम्हाला पनीरमधून जास्त प्रमाणात मिळू शकतं. त्यामुळे नियमित योग्य प्रमाणात पनीरचं सेवन केल्यास, स्नायू बनवण्यासाठी याचा उपयोग होतो.

५. पोटासाठी फायदेशीर ठरतं पनीर

पोटाची समस्या अनेक जणांना असते. पचनक्रिया व्यवस्थित नसल्याने सतत पोट दुखत राहण्याची तक्रार बरेच जण करत असतात. पण पनीर खाल्ल्याने पचनशक्ती वाढते आणि पचनक्रियादेखील नीट होते कारण पनीरमध्ये फायबरचं प्रमाण जास्त असतं. त्यामुळे पोटाची समस्या असल्यास, तुम्ही पनीरचा आपल्या आहारात समावेश करून घेणं नक्कीच फायदेशीर ठरतं.

६. नैराश्य कमी करण्यासाठीही होते मदत

पनीरमध्ये अमिनो ॲसिडचं प्रमाण जास्त असतं जे नैराश्य दूर करण्यासाठी फायदेशीर ठरतं. नैराश्य आलेल्या लोकांना पनीर जास्त प्रमाणात खायला घालायला हवं. ज्या व्यक्ती जास्त त्रस्त असतात त्यांच्यामध्ये नैराश्य आणि तणाव जास्त वाढतो. तणावापासून वाचण्यासाठी योग्य झोप आणि पोषक तत्व असलेल्या जेवणाची गरज असते. त्यासाठी रात्री तुमच्या जेवणामध्ये पनीरचा वापर करणं हे फायदेशीर ठरू शकतं.

तुम्ही याचा नियमित वापर करून नक्की फरक पाहू शकता.





केस आयुष्यभर दाट आणि काळे राहण्यासाठी मेंदीमध्ये करा हे तेल मिक्स

मेंदीमध्ये करा बदामाचं तेल मिक्स

मेंदीमध्ये तुम्ही जर बदामाचं तेल मिक्स केलं तर तुम्हाला नक्कीच चमकदार आणि दाट केस मिळतील. त्यासाठी तुम्हाला जास्त त्रासही सहन करावा लागणार नाही. शिवाय तुम्हाला जास्त पैसेही खर्च करावे लागणार नाहीत. घरच्या घरी तुम्ही सोप्या पद्धतीने हा प्रयोग करून तुमची समस्या दूर करू शकता. बदाम हे केसांसाठी अधिक पौष्टिक आहे. त्यामुळे त्याचा मेंदीसह उपयोग केल्यास, तुम्हाला योग्य आणि चांगला परिणाम मिळतो. पण हे लावण्याची एक पद्धत आहे. त्यामुळे त्या पद्धतीचा वापर करूनच तुम्ही मेंदी लावा.

मेंदी लावण्याच्या एक दिवस आधी तुम्ही मेंदी आणि पाणी घालून मिक्स करून ठेवा

- त्यानंतर ही मेंदी तुम्ही थोडी मंद आचेवर गरम करा ती खाली उतरवल्यावर त्यात दोन चमचे बदामाचं तेल घालून ते व्यवस्थित मिक्स करा आणि हे मिश्रण थंड होऊ द्या
- थंड मिश्रण केसांना लावा आणि सुकेपर्यंत तसंच ठेवा
- सुकल्यानंतर थंड पाण्याने केस धुवा
- असे चार आठवडे केल्यास, तुमचे केस दाट, काळे, चमकदार आणि घनदाट होतील. त्याशिवाय तुमच्या केसांना नैसर्गिक सुंदर रंगही मिळेल

केस अधिक सुंदर करण्यासाठी काही टिप्स

- केस तुम्हाला अधिक सुंदर आणि घनदाट करायचे असतील तर तुम्हाला घरच्या घरी काही उपाय करता येतात. त्यासाठी तुम्ही सोप्या पद्धतीचा वापर करा
- तिळाचे तेल तुम्ही केसांना लावा अथवा त्याचे सेवन करा. तुम्ही तुमच्या आहारामध्ये तिळाच्या तेलाचा वापर केल्यास, तुमचे केस जास्त काळंसाठी काळेभोर राहतात

केस धुताना माईल्ड शॅंपू अथवा नैसर्गिक शिकेकाईचा वापर करा

- केस धुण्याआधी एक कप चहाचे पाणी गरम करून त्यात एक चमचा मीठ मिक्स करून नीट ढवळा. हे मिश्रण केसांना केस धुण्याआधी एक तास लावा आणि मग केस धुवा. यामुळे केस काळे राहण्यास मदत मिळते. मेंदीमध्येही तुम्ही चहाचे पाणी मिक्स करून लावू शकता
- आलं कुटून त्यामध्ये मध घाला आणि पेस्ट तयार करा. ही पेस्ट डोक्याला लावा. यामुळे पांढरे केस काळे होतील

घरच्या घरी कोणत्याही मशीनशिवाय केस असे करा सरळ



- **पीन आणि स्कार्फ पद्धत :** केस सरळ करण्याची ही एक सोपी पद्धत आहे. यासाठी तुम्हाला बॉबी पीन्स, कंगवा आणि स्कार्फ लागेल. आता सगळ्यात आधी तुम्ही तुमचे केस विंचरुन घ्या. केसांच्या क्राऊन भागाकडील केस वर बांधून घ्या आणि उरलेल्या केसांपासून सुरु करा. पुढच्या केसांची बट विंचरुन ते केस मागच्या बाजूला डोक्याभोवती पीन लावत लावत सिक्युअर करा. जर तुमचे केस मोठे असतील असे करताना तुमच्या केसांच्या किमान दोन ते तीन फेऱ्या होणे अगदी स्वाभाविक आहे. असे करत करत तुम्हाला सगळे केस अशाचप्रकारे गुंडाळायचे आहेत. ते नीट राहण्यासाठी तुम्ही तुमच्या केसांना स्कार्फ बांधला तर फारच उत्तम. रात्री झोपण्याआधी हा प्रयोग करा. सकाळी उठल्यानंतर या पीना काढून टाका. तुम्हाला तुमचे केस सरळ दिसतील.
- **शॅम्पू आणि कंडिशनर :** जर तुमचे केस वेवी असतील तर तुम्हाला नुसत्या शॅम्पूचा उपयोग करुनही तुम्हाला तुमचे केस सरळ आणि सिल्की करता येतील. हल्ली स्ट्रेट केसांसाठी खास शॅम्पू मिळतात. याचा उपयोगही तुम्हाला होईल. शॅम्पू करा. कंडिशनर लावताना तुम्ही तुमच्या टीप्स आणि बॉटमला लावा. साधारण ५ मिनिटे तरी तुम्ही कंडिशनर ठेवा. त्यानंतर केस धुवून घ्या. केस धुतल्यानंतर ते वर बांधू नका. टर्कीश टॉवेलने तुमचे केस पुसून घ्या. केस सरळ खालच्या दिशेने पुसा. वाळल्यानंतर केस ब्रशने विंचरा.(पण तुम्ही केस धुवू नका कारण केमिकल्सचा अति प्रयोग करणेही तुमच्या आरोग्यासाठी चांगले नाही.)
- **स्ट्रेट पोनी :** केस सरळ करण्याची आणखी एक सोपी पद्धत म्हणजे स्ट्रेट पोनी. पण केस बांधताना तुम्हाला विशिष्ट पद्धतीने बांधायचे असतात. केस सरळ विंचरुन केसांचा भांग पाडून घ्या. केसांचे बारीक बारीक सेक्शन करुन केसांच्या लांबीनुसार तुम्ही केस बांधा. म्हणजे केसांच्या सगळ्यात वरच्या दिशेला आणि त्यानंतर हळूहळू काही अंतरावर तुम्ही रबराच्या मदतीने केस बांधा. अशा प्रकारे तुम्ही केसांच्या सगळ्या बटा बांधून घ्या. रात्री केस डोक्याच्या खाली येऊ देऊ नका. सकाळी उठून केसांमधून एक एक रबर काढून टाका. केस व्यवस्थित विंचरुन घ्या.

साबुदाणा थालिपीठ

साबुदाणा थालीपीठ सामान्यतः उपवासाच्या काळात (जसे की नवरात्री, एकादशी किंवा शिवरात्री) खाल्ले जाते, कारण ते हलके, ग्लूटेन-मुक्त आणि व्रताला अनुकूल घटकांपासून बनवलेले असते. हा पदार्थ अनेकदा दह्यासोबत किंवा हिरव्या चटणीसोबत दिला जातो. त्याचा बाहेरील थर कुरकुरीत आणि आतील भाग मऊ व चिवट असतो.

साहीत्य :

- २ वाट्या साबुदाणा
- २ मध्यम बटाटे (शिजवलेले)
- १/२ वाटी शेंगदाण्यांचा कूट
- ५-६ हिरव्या मिरच्या
- अर्धी वाटी चिरलेली कोथिंबीर
- १ चमचा लिंबाचा रस
- १ चमचा जीरे
- १/२ चमचा जीरेपूड
- चवीपुरते मिठ
- तेल/ तूप
- थालिपीठ थापण्यासाठी प्लास्टीकची शिट



कृती :

- साबुदाणे पाण्यात भिजवावे.उरलेले पाणी काढून टाकावे. ३-४ तास भिजत ठेवावेत.
- शिजलेले बटाटे नीट कुस्करून घ्यावे.
- मिरच्या बारीक वाटून घ्याव्यात.
- शेंगदाण्याचा कूट : शेंगदाणे भाजून त्याची साले काढावीत आणि मिक्सरवर बारीक करावेत.
- भिजवलेला साबुदाणा, शिजवलेले बटाटे, मिरच्यांचे वाटण, जीरे, जीरेपूड, शेंगदाण्याचा कूट, कोथिंबीर, लिंबाचा रस आणि चवीपुरते मीठ घालून नीट मिक्स करावे. मिश्रणाचे मध्यम आकाराचे गोळे करावे.
- प्लास्टीक शिटला तूपाचा हात लावून गोळे थापावे. थालिपीठाच्या मध्यभागी तूप सोडण्यासाठी एक छिद्र करावे.
- नॉनस्टीक तव्यावर थोडे तूप सोडावे. मिडीयम हाय हिटवर थालिपीठाला झाकण ठेवून वाफ काढावी. दोन्ही बाजूने खरपूस करून घ्यावे. दही, मिरचीचा ठेचा, किंवा लिंबाचे गोड लोणचे यांबरोबर हे थालिपीठ छान लागते.

डायफ्रूट्स हे आहेत लाभदायक फराळ



डायफ्रूट्समध्ये मोठ्या प्रमाणात पोषक तत्त्वे असतात. यामध्ये विटामिन, मिनरल्स, कॅल्शियम आणि अनस्यच्युरेटेड फॅटी ॲसिड असतात. यामुळे ड्रायफ्रूट्स खाल्ल्याने त्याचा चांगला फायदा होतो.

बदाम - बदाम रक्तात ग्लूकोज लेवल मॅनेज लेवल करायला मदत करतो. त्यासोबतच स्ट्रेस कमी करायला पण मदत होते. त्यामुळे कच्चा बदाम खाणे चांगली गोष्ट आहे. त्यासोबतच बदाम रात्रभर भिजत ठेवल्यास उत्तम.

अक्रोड - अक्रोडमध्ये जास्त कॅलरीज असतात. थोडेसे अक्रोड खाऊनही तुम्ही खूप वेळा उपाशी राहू शकता. यामुळे तुम्हाला थोड्या झ्र थोड्या वेळात काही खाण्याची आवश्यकता भासणार नाही आणि यामुळे शुगर देखील कंट्रोलमध्ये राहण्यास मदत होते.

काजू - काजूमध्ये मोठ्या प्रमाणात विटामिन - ई असतात. त्यामुळे काजूचे सेवन केल्याने त्वचा चांगली राहते आणि आपण अधिक तरुण दिसतो.

पिस्ता - पिस्तामध्ये खूप एर्नजी असते. यात खूप प्रोटीन आणि चांगले फॅट्स असतात. रिसर्चनुसार पिस्ता मधुमेह झ्र ब्लड शुगर मेनटेन करायलाही मदत होते. खारे पिस्ता खाण्याचे टाळा. रोज फ्रूट सॅलेडसोबत जास्त पिस्ता खा. त्याचा अधिक फायदा होतो.

मनुके - आंबट गोड चव असणारे आणि लहान आकाराचे मनुके आपल्या आरोग्यासाठी लाभदायक असतात हे फारसे अनेकांना माहित नसते. ड्रायफ्रूटमधील मनुके बऱ्याच आजारांवरील रामबाण उपाय देखील ठरतात. लठ्ठपणामुळे त्रस्त असाल तर मनुके खाणे हे तुमच्या फायद्याचे ठरू शकते. मनुकांमध्ये नैसर्गिक साखर असते, जी शरीरात अगदी सहजरित्या पचते. दररोज मनुके खाल्ल्यामुळे वजन कमी व्हायला मदत होते.

टाईप २ डायबिटस नियंत्रणात ठेवण्यासाठी मदत करतं 'व्हिटॅमिन डी'?



तुम्हाला जर काही दिवसांपूर्वीच समजलं असेल की, तुम्ही टाइप-२ डायबिटीसने ग्रस्त आहात किंवा तुम्ही प्री-डायबीटीसच्या स्टेजमध्ये असाल तर, तुमच्यासाठी सप्लिमेंट म्हणून व्हिटॅमिन डीच्या गोळ्या फायदेशीर ठरतात. कारण काही दिवसांपूर्वी करण्यात आलेल्या एका रिसर्चमधून असं सिद्ध झालं आहे की, व्हिटॅमिन डीच्या सप्लिमेंट्स डायबिटीस आणखी वाढविण्यापासून रोखतात. यूरोपियन जर्नल ऑफ इन्डोक्रिनोलॉजमध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या एका संशोधनातून असं सिद्ध झालं आहे.

संशोधनातून सिद्ध झाल्यानुसार, व्हिटॅमिन डी सप्लिमेंटचा हाय डोस ग्लूकोज मेटाबॉलिज्म वाढवतं. ज्यामुळे डायबिटीसवर नियंत्रण मिळवणं शक्य होतं. खरं तर टाइप २ डायबिटीस एक अशा आजार आहे, जो सध्या जगभरामध्ये थैमान घालत आहे. अनेक लोक डायबिटीसच्या समस्येने हैराण आहेत. जर तुम्हाला टाइप २ डायबिटीज झाला तर त्यानंतर तुम्हाला अधत्व, किडनी फेलियर आणि हार्ट डिजीज यांसारख्या गंभीर आजार होण्याचा धोका अनेक पटिंनी वाढतो.

व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे डायबिटीसचा धोका ज्या व्यक्ती प्री-डायबीटीज स्टेजमध्ये असतात म्हणजेच, ज्यांच्यामध्ये टाइप २ डायबीटीस विकसित होण्याचा धोका अधिक आहे, त्यांच्यामध्ये लठ्ठपणा किंवा अनुवंशिकता यांसारखे रिस्क फॅक्टर्स दिसून येतात. दरम्यान, याआधी करण्यात आलेल्या अनेक संशोधनांमधून व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे टाइप २ डायबीटीस होण्याचा धोका वाढतो. सप्लिमेंट देण्याच्या आधी आणि नंतर करण्यात आली तपासणी

संशोधनामध्ये सहभागी करण्यात आलेल्या सर्व लोकांची इन्सुलिन फंक्शन आणि ग्लूकोज मेटाबॉलिज्मला विटमिन डी सप्लिमेंटेशनचा हाय डोस देण्याआधी आणि ६ महिन्यानंतर तपासणी करण्यात आली. यामध्ये ४६ टक्के पार्टिसिपेंट्समध्ये व्हिटॅमिन डीची लेव्हल कमी होती. परंतु, व्हिटॅमिन डी सप्लिमेंटचं सेवन ६महिन्यानंतर त्यांच्या टिश्यूमध्ये इन्सुलिनचं प्रमाण वाढतं गेलं.



मुलांना चष्म्याची गरज कशी ओळखाल?

हल्ली अगदी लहान वयातच मुलांना चष्मा लागण्याचे प्रमाण झपाट्याने वाढताना दिसत आहे. वाढलेला स्क्रीन टाइम, मोबाईलचा वापर, चुकीच्या सवयी आणि अभ्यासाचा ताण यामुळे अनेक मुलांमध्ये डोळ्यांच्या समस्या लवकर दिसून येतात. मात्र, अनेकदा मुलांना स्वतःला नीट दिसत नाही हे सांगता येत नाही. त्यामुळे पालकांनीच काही लक्षणांकडे लक्ष देणं गरजेचं ठरतं. म्हणूनच मुलांच्या वागण्यात किंवा सवयींमध्ये दिसणारे छोटे बदल दुर्लक्षित न करता वेळीच डोळ्यांची तपासणी करणं आवश्यक आहे.

मुलांना चष्म्याची गरज का भासते?

प्रत्येकवेळी फक्त कमी दिसतं म्हणूनच मुलांना चष्मा लागतो असं नाही. काही मुलांमध्ये डोळ्यांचा ताण, तिरळेपणा, आळशी डोळा (छंएट एटी) किंवा डोळ्यांच्या स्नायूंमधील असंतुलन यामुळेही चष्म्याची गरज भासू शकते. योग्य वेळी उपचार मिळाल्यास भविष्यातील मोठ्या समस्या टाळता येऊ शकतात.

1) टीव्ही किंवा पुस्तक खूप जवळून पाहणे

जर मूल सतत टीव्हीजवळ बसत असेल किंवा पुस्तक चेहऱ्याच्या अगदी जवळ धरून वाचत असेल, तर ते निकटदृष्टी (ट८ङ्कस्त्रं) चे लक्षण असू शकते. दूरच्या वस्तू स्पष्ट दिसत नसल्यामुळे मूल नकळत जवळ जाऊन पाहण्याचा प्रयत्न करतं.

2) डोळे बारीक करून पाहणे

लांबचं स्पष्ट दिसावं म्हणून काही मुलं वारंवार डोळे बारीक करून पाहतात. हे दृष्टीवर ताण येत असल्याचं संकेत असू शकतं. विशेषतः टीव्ही पाहताना किंवा शाळेत फळ्याकडे पाहताना अशी सवय दिसल्यास वेळीच तपासणी करणं गरजेचं आहे.

3) वारंवार डोळे चोळणे किंवा पाणी येणे

मूल सतत डोळे चोळत असेल, तर त्यामागे डोळ्यांचा थकवा किंवा आय स्ट्रेन कारणीभूत असू शकतो. काही वेळा डोळे लाल होणे किंवा विनाकारण पाणी येणेही दृष्टीदोषाचे संकेत असू शकतात.

4) मान तिरकी करून पाहणे

काही मुलं वस्तू नीट दिसण्यासाठी वारंवार मान एका बाजूला झुकवतात किंवा डोकं तिरकं करून पाहतात. हे डोळ्यांच्या स्नायूंमधील असंतुलन किंवा तिरळेपणाचं लक्षण असू शकतं.

5) अभ्यासावरही होतो परिणाम

दृष्टी नीट नसल्यामुळे मुलांना फळ्यावरचं दिसत नाही किंवा वाचन करताना त्रास होतो. त्यामुळे अभ्यासात लक्ष न लागणे, वाचताना शब्द गाळणे किंवा ओळी चुकवणे अशा समस्या दिसू शकतात. काही मुलं बोट ठेवून वाचतात किंवा पटकन अभ्यासाचा कंटाळा करतात.

6) डोकेदुखी आणि प्रकाशाचा त्रास

शाळेतून आल्यावर वारंवार डोकेदुखी होणे, उजेडात डोळे उघडताना त्रास होणे किंवा प्रकाश सहन न होणे ही देखील कमकुवत दृष्टीची लक्षणं असू शकतात. अशावेळी डोळ्यांवर ताण येत असल्याची शक्यता असते.

पालकांनी काय काळजी घ्यावी?

- मुलांचा स्क्रीन टाइम मर्यादित ठेवा.
- मोबाईल किंवा टीव्ही योग्य अंतरावरून पाहण्याची सवय लावा.
- बाहेर खेळण्यासाठी प्रोत्साहन द्या.
- वर्षातून किमान एकदा डोळ्यांची तपासणी करून घ्या.
- संतुलित आहारात गाजर, हिरव्या भाज्या आणि फळांचा समावेश करा.



पालक मुलांना वेळ देऊ शकत नाही

सध्याच्या परिस्थितीत घरातील बरेच आई - वडिल नोकरीकरता बाहेर पडतात. त्यामुळे त्यांना या स्पर्धेच्या युगात स्वतःसाठीही वेळ देणे कठीण होते. त्यातच घरात लहान मुले असतील तर त्यांना देखील पुरेसा वेळ देता येत नाही. परंतु, प्रत्येक आई - वडिलांना आपल्या मुलांसह वेळ घालवायचा असतो. मात्र, काही केल्या ते शक्य होत नाही. पण, जर तुम्ही या गोष्टी केल्यात तर पालकांना आपल्या मुलांसोबत वेळ घालवणे सहज शक्य होईल.

मोबाईलपासून दूर रहा - दररोजच्या कामात घरी आल्यानंतर थोडासा वेळ मिळतो. मात्र, त्यावेळी देखील आपण मोबाईल घेऊन बसतो. तसेच करु नका. घरी आल्यानंतर मोबाईल दूर ठेवा आणि मुलांना दिवसभर काय काय केले याची विचारपूस करा. त्यामुळे मुलांनी दिवसभर काय केले ते तुमच्याकडे मनमोकळेपणाने सांगू शकतील.

शॉपिंग टाळा - बऱ्याचदा सुट्टीच्यावेळी शॉपिंगकरता बाहेर जाणे होते. मात्र, जर खरचं शॉपिंगची आवश्यकता असल्यास बाहेर पडा. अन्यथा तो वेळ तुमच्या मुलांसोबत गप्पा मारण्यात घालवा.

तुम्हीही लहान व्हा - मुलांनसोबत असताना तुम्हीही लहान व्हा. त्यांच्यासोबत तुम्हीही खेळा. त्यामुळे मुले खुश राहून तुमच्यासाठी अधिक खुलेपणाने राहू शकतील.

सोशल साइट्सवर कमी वेळ द्या - आजकालच्या जगात लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वच जण सोशल मीडियाचा वापर करतात. सातत्याने फेसबुक, इन्स्टाग्राम, हँ३२ंस्त्रस्त्र सारख्या सोशल साइट्सवर ऊ३५ी असतात. त्यामुळे मुलांना कमी वेळ दिला जातो. सोशल साइट्सपेक्षा मुलांसोबत खेळा, त्यांच्यासोबत फिरायला जा, त्यामुळे तुम्हाला अधिकाधिक वेळ मुलांसोबत मिळू शकतो.

व्यायाम करा - तुम्ही जर दररोज व्यायाम करत असाल तर त्यात तुमच्या मुलांना देखील सामिल करा. त्यांनाही तुमच्यासोबत मॉर्निंग वॉकसाठी बाहेर घेऊन जा. त्यामुळे त्यांनाही चांगल्या सवयी लागून आरोग्यही उत्तम राखण्यास मदत होईल. त्यासोबतच तुम्ही एकमेकांसोबत अधिक वेळ घालवू शकाल.

नालेसफाईवर सत्ताधारीच नाराज... झोन - 5 मध्ये कामांचे तीनतेरा

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबई महापालिकेने हाती घेतलेल्या नालेसफाईच्या कामांबाबत प्रशासन एकीकडे 85 टक्क्यांपेक्षा जास्त नालेसफाई झाल्याचा दावा करीत असले, तरी महापालिकेच्या झोन झ 5 मधील कुर्ला, चेंबूर, टिळकनगर, मानखुर्द, गोवंडी आदी भागातील नाले तुंबलेले असल्याचे आढळून आल्याने सत्ताधारी भाजप पक्षाने विशेषतः सभागृहनेते गणेश खणकर आणि स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच, पावसाळा सुरू होण्यापूर्वी मनुष्यबळासह यंत्रणा कामाला लावावी आणि नालेसफाईची कामे पूर्ण करावी. आम्ही पुन्हा पाच दिवसांनी नालेसफाई कामांची पाहणी करणार असल्याचे सांगत संबंधित अधिकाऱ्यांना चांगलाच सज्जड दम देत तसे निर्देशही स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. मुंबईतील नालेसफाईच्या कामांबाबत स्थायी



समितीच्या मागील बैठकीत सर्वपक्षीय सदस्यांनी आगपाखड करीत तीव्र नाराजी व्यक्त केली होती. तसेच, त्यावेळी स्थायी समितीने नालेसफाई कामांचा पाहणी दौरा करण्याची मागणी काही सदस्यांनी केली होती. विशेषतः विरोधी पक्षाच्या सदस्यांनी तशी मागणी केली होती. त्याची दखल घेत स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी 25 आणि 26 मे रोजी दोन दिवस नालेसफाई पाहणी दौऱ्याचे नियोजन गेल्या शुक्रवारी जाहीर केले होते. त्यानुसार सोमवारी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पूर्व उपनगर विभागात नालेसफाई पाहणी दौरा करण्यात आला. यावेळी, स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी मिठी नदी, झोन झ 5 मधील नालेसफाई कामांची विशेषतः कुर्ला, मानखुर्द, गोवंडी, सुभाषनगर येथील नाल्यांची दयनीय अवस्था पाहून नाराजी व्यक्त केली.

26 सदस्यांपैकी अध्यक्षांसह फक्त 7 सदस्यांची उपस्थिती

या नालेसफाई पाहणी दौऱ्याला स्थायी समितीच्या 26 सदस्यांपैकी प्रभाकर शिंदे, सभागृहनेते गणेश खणकर, शिवसेनेच्या दीपमाला बढे, मीनाक्षी पाटणकर, काँग्रेस पक्षाचे गटनेते अशरफ आजमी, एमआयएम पक्षाचे जमीर कुरेशी, भाजपच्या प्रीति सातम या सात सदस्यांनी उपस्थिती नोंदवली. मात्र, उर्वरित सर्वपक्षीय 19 सदस्यांच्या अनुपस्थितीबाबत माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. या पाहणी दौऱ्याची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार, बेस्टच्या बसगाडीचा वापर करून प्रभाकर शिंदे यांनी पत्रकारांसह मुलुंड येथून ते कुर्ला पूर्व विभागापर्यंत प्रवास करून इंधन बचत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, नंतर अरुंद रस्त्यांच्या ठिकाणी पटकन ये-जा करण्यासाठी बेस्ट बस वापरणे अवघड झाल्याने पुढे स्थायी समितीच्या काही सदस्यांनी स्वतःच्या वाहनांमधून प्रवास करीत नालेसफाई पाहणी दौरा पूर्ण केला.

मिठी नदीची वरवर सफाई, यंत्रणेची कमतरता

कुर्ला, बीकेसी येथे मिठी नदीच्या पात्रात गाळ काढण्याचे काम सुरू असताना स्थायी समिती सदस्यांनी त्याठिकाणी भेट दिली असता सफाई कामासाठी पलटून आणि लाँगबूम या मशीनची कमतरता असल्याचे निदर्शनास आले. त्यावर स्थायी समिती अध्यक्षांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता संबंधित अधिकाऱ्यांनी यंत्रणा कमी पडत असल्याची कबुली दिली. त्यामुळे मिठी नदीच्या सफाई कामावर परिणाम होत असल्याचे दिसून आले. त्यातही संबंधित ठिकाणी स्थायी समिती पाहणी करणार असल्याने कंत्राटदाराकडून काही अवधीपूर्वीच सफाई कामाला सुरुवात केल्याचे निदर्शनास आले. तसेच, गोवंडी व चेंबूर रेल्वे स्थानक (एम पश्चिम विभाग) येथील सुभाषनगर नाल्यामध्ये काही प्रमाणात कचरा आणि गाळ साचल्याचे निदर्शनास आले. त्यावर स्थायी समिती अध्यक्ष शिंदे यांनी, त्याचा जाब विचारला असता संबंधित अधिकाऱ्यांनी काही दिवसांपूर्वीच सदर नाल्यांमधून गाळ काढल्याचा दावा करीत त्यामध्ये पुन्हा कचरा टाकण्यात आल्याने नाल्यात गाळ, कचरा साचला असल्याची कारणे देत नालेसफाईचे काम झाल्याचा दावा केला. तसेच, उद्या पुन्हा मशीनचा वापर करून कचरा आणि गाळ काढण्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला.

२३,००० पाणथळ जागांची प्रत्यक्ष पडताळणी पूर्ण...

कायदेशीर संरक्षणाचा मार्ग मोकळा

■मुंबई। प्रतिनिधी,

'नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट'ने (एनसीएससीएम) महाराष्ट्रातील एकूण २३,४१५ पाणथळ जागांपैकी अवघ्या ११ जागा वगळता इतर सर्व जागांची प्रत्यक्ष पडताळणी म्हणजेच 'ग्राऊंड-ट्रुथिंग' यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. यामुळे या पाणथळ जागांना 'पाणथळ जागा (संरक्षण आणि व्यवस्थापन) नियमां'तर्गत कायदेशीर संरक्षण मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

'ग्राऊंड-ट्रुथिंग' म्हणजे उपग्रहाद्वारे मिळालेल्या चित्रांच्या (सॅटेलाइट इमेज) आधारे जमिनीवर जाऊन प्रत्यक्ष सर्वेक्षण करणे. यामध्ये पाणथळ जागांचे अस्तित्व, त्यांच्या सीमा आणि सध्याचा जमिनीचा वापर यांची खात्री केली जाते. पर्यावरण कायद्यांतर्गत कोणत्याही पाणथळ जागेची अधिकृत अधिसूचना जारी करण्यापूर्वी ही अत्यंत महत्त्वाची पायरी मानली जाते.

'एनसीएससीएम'द्वारे व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या 'महाराष्ट्र वेटलँड्स डॅशबोर्ड'वरील ताज्या



आकडेवारीनुसार, राज्यातील उर्वरित ११ पाणथळ जागा पुणे जिल्ह्यात आहेत, ज्यांची क्षेत्रीय पातळीवरील पडताळणी अजूनही सुरू आहे. आतापर्यंत झालेल्या सर्वेक्षणानुसार ठाणे जिल्ह्यात २४७, रायगड जिल्ह्यात १,०९३, मुंबई शहरात ३७ आणि मुंबई उपनगरात २१० पाणथळ जागांची नोंद आहे.

पर्यावरणवाद्यांकडून चिंता आणि मागणी

राष्ट्रीय पाणथळ जागा नकाशा लाँच झाल्यानंतर ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी १६ वर्षे लागायला नको होती. या प्रदीर्घ दिरंगाईमुळे महाराष्ट्रातील पाणथळ परिसंस्थेचे, विशेषतः जैवविविधतेने नटलेल्या उरण आणि मुंबई महानगर प्रदेशाचे मोठे नुकसान झाले आहे. येथे ढिगारे टाकणे, अतिक्रमणे आणि अनिर्बंध भराव घालून जमीन बळकावण्याचे प्रकार सातत्याने सुरू आहेत. आता ही पडताळणी जवळपास पूर्ण झाल्यामुळे, सरकारने विलंब न करता या पाणथळ जागांची अधिसूचना काढून त्यांना तातडीने कायदेशीर संरक्षण दिले पाहिजे, अशी प्रतिक्रिया 'नॅटकनेक्ट फाऊंडेशन'चे संचालक बी. एन. कुमार यांनी दिली. 'सागरशक्ती' या पर्यावरण संस्थेचे संचालक नंदकुमार पवार यांनी दावा केला की, उरणमधील पाणथळ जागा नष्ट झाल्यामुळे तेथील पूरस्थिती अधिक गंभीर झाली आहे.

पुढील पाऊल काय?

केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या 'एनसीएससीएमह्णकडे महाराष्ट्र सरकारने उपग्रह मॅपिंग, दस्तावेजीकरण आणि प्रत्यक्ष पडताळणीची जबाबदारी सोपवली होती. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आता या पडताळणी केलेले नकाशे जिल्हा प्रशासन आणि राज्य पाणथळ प्राधिकरण यांच्याकडे पाठवले जातील, ज्यानंतर अंतिम अधिसूचना जारी करण्याची प्रक्रिया सुरू होईल.

मराठी न शिकल्यास चालकांवर कारवाई अटळ...

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा इशारा

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्रात व्यावसायिक प्रवासी वाहन चालवणाऱ्या प्रत्येक चालकाला व्यावहारिक मराठी येणे अत्यावश्यक आहे. चालकांनी मराठी शिकण्यासाठी तीन महिन्यांची मुदत मागितली होती. शासनाने त्यांना तब्बल १०५ दिवसांची मुदत दिली आहे. मात्र, या कालावधीत जर त्यांनी किमान 'व्यावहारिक मराठी' आत्मसात केली नाही तर १६ ऑगस्टपासून त्यांच्यावर कारवाई करणे अटळ ठरेल, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. रंगशारदा मंदिर येथे आयोजित हिंदी भाषिकांच्या नवभारतीय शिव वाहतूक संघटनेच्या वर्धापन दिन व जल्लोष मेळावा कार्यक्रमात ते बोलत होते. ते म्हणाले, हिंदी भाषिक चालकांना स्वयंस्फूर्तीने मराठी शिकवण्यासाठी हाजी अराफत शेख यांनी केलेला उपक्रम कौतुकास्पद आहे. अशा पद्धतीने चालक स्वतःहून पुढे येत असतील, तर शासनदेखील त्यांना मदत करण्यास तयार आहे. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार, आमदार प्रवीण दरेकर यांच्यासह रिक्षा व टॅक्सीचालक उपस्थित होते.

कौतुकास्पद कामगिरी

नवभारतीय शिव वाहतूक संघटनेने चालकांसाठी मराठी भाषा प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय कौतुकास्पद असून सरकारच्या माध्यमातून चालकांसाठी कल्याणकारी योजना, प्रशिक्षण व व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम राबवले जात असल्याचे ते म्हणाले.

चालक अर्थचक्राला गती देणारा शिल्पकार

राज्यातील रिक्षा, टॅक्सी, बस आणि



ट्रकचालकांच्या योगदानाचा गौरव करताना मंत्री सरनाईक म्हणाले, व्यावसायिक वाहनचालक हा केवळ चालक नसून महाराष्ट्राच्या अर्थचक्राला गती देणारा खरा शिल्पकार आहे. वाहतूक क्षेत्र हे समाजाशी थेट जोडलेले असल्याने चालकांचे बोलणे, वर्तन आणि भाषा यावर संपूर्ण व्यवस्थेची प्रतिमा अवलंबून असते, असेही त्यांनी नमूद केले.

प्रवाशाशी संवाद साधता आला पाहिजे

महाराष्ट्र ही संतांची, विचारवंतांची आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची भूमी असल्याचे सांगत त्यांनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. 'प्रवासी वाहनात बसल्यानंतर त्याला आपल्या भाषेत संवाद साधता आला पाहिजे. 'नमस्कार', 'कुठे जायचे?', 'किती भाडे होईल?' एवढे तरी व्यावहारिक मराठी प्रत्येक चालकाला आले पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

गैरसमज कमी होतील, सुसंवाद वाढेल

परराज्यातून महाराष्ट्रात येऊन प्रामाणिकपणे काम करणाऱ्या चालकांचे स्वागत करतानाच स्थानिक भाषा आत्मसात केल्यास प्रवासी, पोलीस, प्रशासन आणि स्थानिक नागरिकांशी संवाद अधिक सुलभ होईल, सुसंवाद वाढेल, गैरसमज कमी होतील आणि सेवा अधिक सुसंस्कृत बनेल, असेही सरनाईक म्हणाले.

आंबेनळी घाटात भीषण अपघात

७०० फूट दरीत स्कॉर्पिओ कोसळून ८ तरुणांचा मृत्यू



■रायगड। प्रतिनिधी,

रायगड आणि सातारा जिल्ह्यांच्या सीमेवर असलेल्या महाबळेश्वर-पोलादपूर मार्गावरील धोकादायक आंबेनळी घाटात रविवारी पहाटे भीषण अपघात घडला. प्रवाशांनी भरलेली एक स्कॉर्पिओ जिप अनियंत्रित होऊन तब्बल ५०० ते ७०० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना समोर आली आहे. या भीषण दुर्घटनेत वाहनातील सर्व ८ तरुणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून, मृत सर्वजण सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील आसगाव गावचे रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे, २०१८ मध्ये दापोली कोकण कृषी विद्यापीठाच्या बसला ज्या ठिकाणी भीषण अपघात झाला होता, त्याच परिसरात हा अपघात घडल्याने पुन्हा एकदा आंबेनळी घाटाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास घडली दुर्घटना

मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात रविवारी पहाटे सुमारे २:४५ वाजता घडला. आसगाव येथील आठ तरुण स्कॉर्पिओ जिपमधून प्रवास करत होते. आंबेनळी घाटातील एका तीव्र आणि धोकादायक वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने गाडी थेट दरीत कोसळली. घाटातील अंधार, खोल दरी आणि कठीण भौगोलिक परिस्थितीमुळे अपघात अधिक भीषण होता. वाहन दरीत कोसळल्यानंतर मोठा आवाज झाला. मात्र दरी अत्यंत खोल असल्याने वाहनापर्यंत पोहोचणे आणि परिस्थितीचा अंदाज घेणे सुरुवातीला कठीण झाले.

बचावकार्यात अनेक पथकांचा सहभाग

अपघाताची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस, स्थानिक प्रशासन आणि विविध बचाव पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. दरीची खोली ५०० ते ७०० फूट असल्याने बचाव आणि शोधमोहीम राबवताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. महाबळेश्वर रेस्क्यू टीम, प्रतापगड रेस्क्यू टीम, सिस्केप महाड-पोलादपूर, आपदा मित्र तसेच स्थानिक स्वयंसेवक आणि मदत पथके घटनास्थळी कार्यरत आहेत. बचाव पथकाने दरीत उतरून शोधमोहीम सुरू केली असून, आतापर्यंत दोन मृतदेह बाहेर काढण्यात यश आले आहे. उर्वरित मृतदेहांचा शोध घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

या दुर्घटनेची माहिती समोर येताच आसगाव गावासह संपूर्ण कोरेगाव तालुक्यात शोककळा पसरली आहे. एका गावातील आठ तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. अपघाताचे नेमके कारण काय होते, याचा तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू करण्यात आला असून, पुढील चौकशीनंतर अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. दरम्यान, आंबेनळी घाटातील धोकादायक वळणे, खोल दऱ्या आणि वारंवार घडणारे अपघात लक्षात घेता या मार्गावरील सुरक्षाव्यवस्था अधिक मजबूत करण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

कोट्यावधी खर्चूनही पालिका शाळेतील विद्यार्थ्यांना उशिराने मिळणार रेनकोट, छत्री?

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई महापालिकेच्या शाळांमधील पूर्व प्राथमिक, इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या 2.95 लाख शालेय विद्यार्थ्यांना पावसाळ्यात वापरण्यासाठी 7.29 कोटी रुपये खर्चून रेनकोट देण्यात येणार आहेत. तसेच, इयत्ता सातवी आणि इयत्ता आठवीमधील एकूण 73,781 विद्यार्थ्यांना छत्र्या देखील उपलब्ध करण्यात येणार असून त्यासाठी पालिका 3.51 कोटी रुपये खर्च करणार आहे. मात्र शाळा सुरू होण्यापूर्वी या विद्यार्थ्यांना या पावसाळी वस्तू मिळण्यास उशीर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चूनही पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना पावसाळी वस्तूंचा पुरवठा वेळेत न होता उशिराने होणार असेल तर त्याचा उपयोग काय, अशी चर्चा पालिका वर्तुळात सुरू असल्याची चर्चा कानावर पडत आहे.

महापालिकेतील विद्यार्थ्यांना रेनकोट आणि छत्रीसह 27 प्रकारच्या शाळेय वस्तू देण्याबाबतच्या प्रस्तावाला आज स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.



मात्र यावेळी, स्थायी समिती सदस्यांनी महापालिकेकडून शालेय विद्यार्थ्यांना पुरवण्यात येणाऱ्या 27 प्रकारच्या शालेय वस्तूंचा दर्जा चांगला असावा, अशी मागणी करण्यात आली. मनसेचे गटनेते यशवंत किल्लेदार यांनी शालेय वस्तूंचा दर्जा निकृष्ट असू नये, असे सुचवले. तसेच, वस्तू देण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात वस्तूंचे पैसे जमा करण्याची मागणी केली.

काँग्रेस पक्षाचे गटनेते अशरफ आजमी यांनी रेनकोट पुरवठादारांमध्ये फक्त एकच पुरवठादार असताना त्यालाच कंत्राट का देता? असा सवाल उपस्थित केला. मात्र अतिरिक्त आयुक्त विपिन शर्मा यांनी आणखीन काही कंत्राटदारांनी देखील टेंडर प्रक्रियेत भाग घेतला होता, मात्र त्रुटी निघाल्याने ते अपात्र ठरल्याचे कारण देत प्रशासनाची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. पालिकेने शालेय वस्तूंच्या पुरवठादारांची साखळी मोडून काढत जेम पोर्टल माध्यमातून शालेय वस्तूंची खरेदी केल्याने पालिकेचे कोट्यवधी रुपयांची बचत झाल्याचा दावा केला आहे.

विद्यार्थ्यांसाठी खरेदी करण्यात येत असलेल्या रेनकोटची किंमत बाजारात 218 रुपये एक नग असताना पालिकेने एक नग रेनकोट 166 रुपयांत खरेदी करून 30 ते 40 कोटी रुपयांची बचत केल्याचा दावा स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी यावेळी केला.

आळंदीत दानपेटीवर सेवेकऱ्याचा डल्ला

■पुणे। प्रतिनिधी,

तीर्थक्षेत्र आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराच्या दानपेटीवर एका विश्वासू सेवेकऱ्यानेच डल्ला मारल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. गेल्या काही महिन्यांपासून माऊलींच्या चरणी अर्पण होणाऱ्या दानावर हात साफ करणाऱ्या विशाल बाळू वारुळे या सेवेकऱ्याला आळंदी पोलिसांनी अटक केली असून, त्याच्या घरातून पावणे चार लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्नर तालुक्यातील वारुळेवाडी येथील रहिवासी असलेला विशाल वारुळे हा सुमारे वर्षभरापूर्वी मंदिरात आला होता. सुरुवातीला त्याने भोजनालयातील आचाऱ्याचा विश्वास संपादन केला आणि नंतर हळूहळू कॅशियरशी जवळीक वाढवून स्वतःला प्रामाणिक सिद्ध केले. त्याच्या या 'प्रामाणिक' वागण्यावर विश्वास ठेवून मंदिर प्रशासनाने त्याला तीन महिन्यांपूर्वी दानपेटीतील रक्कम जमा करण्याच्या कामात सहभागी करून घेतले. मात्र, याच विश्वासाचा गैरफायदा घेत त्याने चोरीचे सत्र सुरू केले.

तपासात समोर आले आहे की, १२, १३ आणि १६ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत त्याने दानपेटीतील रक्कम मोजताना नजर चुकवून चोरी केली होती. विशालची चोरी करण्याची पद्धत अत्यंत अनोखी आणि नियोजनबद्ध होती. दानपेटी उघडल्यानंतर रक्कम बादलीत भरत असताना तो काही रक्कम गुपचूप स्वतः आणलेल्या पिशवीत भरत असे. ही रोकड बाहेर नेण्यासाठी तो एक शक्कल लढवायचा; तो मंदिरातील हार घरी घेऊन जात असल्याचे सांगायचा आणि पिशवीत वरच्या बाजूला हार दिसेल अशा बेताने ठेवायचा, जेणेकरून खाली असलेली रोकड कोणाला दिसणार नाही. घरी पोहोचल्यावर तो ही रोकड मोजून आपल्या बेडमध्ये लपवून ठेवत असे. पोलिसांनी त्याच्या घरातून जप्त केलेल्या रोकडमध्ये १०, २०, ५० आणि १०० रुपयांच्या नोटांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे.

मुंबई-आग्रा महामार्गावर भीषण अपघात... पाच ठार

■धुळे। प्रतिनिधी,

मुंबई-आग्रा महामार्गावर भीषण अपघात होऊन पाच जण ठार झाल्याची घटना घडली आहे. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील लळिंग घाटात रविवारी पहाटे ही भीषण तिहेरी अपघाताची घटना घडली आहे. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला असून १० ते १२ जण गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. रेतीने भरलेल्या डंपरने एका वाहनाला धडक दिली, याचवेळी मागून आलेली ट्रॅव्हल्स वाहन जोरदार धडकल्याने हा तिहेरी अपघात घडला. या अपघातानंतर घाट परिसरात एकच खळबळ उडाली असून महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, लळिंग घाटातून भरधाव वेगाने जाणाऱ्या रेतीच्या डंपरवरील चालकाचे नियंत्रण सुटले. यामुळे डंपर विरुद्ध बाजूला गेला आणि समोरून जाणाऱ्या एका वाहनावर धडकला. याचवेळी मालेगावकडून आलेले ट्रॅव्हल्स वाहन अपघातग्रस्त वाहनांवर जोरदार धडकले. ही धडक इतकी भीषण होती की वाहनांचा अक्षरशः चुराडा झालाय.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, महामार्ग पोलीस, तसेच टोल नाक्यावरील मदत पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना बाहेर काढण्यासाठी मोठे बचावकार्य राबविण्यात आले. गंभीर जखमींना उपचारासाठी धुळे येथील शासकीय व खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. मृतांची आणि जखमींची ओळख पटविण्याचे काम सुरू असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, अपघातस्थळी मदतकार्य करत असताना लळिंग टोल नाक्यावरील काही कर्मचाऱ्यांचाही अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे संतप्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी लळिंग टोल नाक्यावर आंदोलन सुरू करत टोल वसुली बंद पाडली. "आम्हाला कोणतीही सुरक्षा नाही, विमा संरक्षण नाही, तरीही आम्ही जीव धोक्यात घालून अपघातग्रस्तांना मदत करतो. आमच्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आवश्यक सुविधा व सुरक्षा पुरवायला हवी होती," असा आरोप आंदोलक कर्मचाऱ्यांनी केला. या आंदोलनामुळे काही काळ महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

अपघातानंतर लळिंग घाट परिसरात काही काळ भीतीचे आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाल्याने दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

शाळा सोडल्याचा दाखला काढण्यासाठी गेलेल्या महिलेकडे शारीरिक संबंधांची मागणी

अकोल्यातील घटनेने संताप

■मुंबई। प्रतिनिधी,

अकोला जिल्ह्यातील बाळापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुलीचा शाळा सोडल्याचा दाखला अर्थात टीसी काढण्यासाठी शाळेत गेलेल्या महिलेकडे तेथील कर्मचाऱ्याने शारीरिक संबंधांची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त केला जात असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बाळापूर येथील एका शाळेत पीडित महिला आपल्या मुलीचा टीसी काढण्यासाठी गेली होती. यावेळी शाळेतील मनीष शर्मा नामक कर्मचाऱ्याने महिलेशी अयोग्य वर्तन करत टीसी देण्यासाठी शरीरसुखाची मागणी केल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे महिला हादरली असून तिने तात्काळ



बाळापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

या घटनेनंतर नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात असून शैक्षणिक संस्थांमधील महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

भावोजीकडून मेहुणीची हत्या

कौटुंबिक वादातून मेहुणीची चाकूने भोसकून खून केल्याची धक्कादायक नाशिकच्या देवळा तालुक्यातील भऊर फाटा परिसरात समोर आली आहे. छाया ज्ञानेश्वर जाधव असं पीडितेचं नाव आहे. तर श्याम माळी हा आरोपी आहे.

श्याम व त्याच्या पत्नीमध्ये वारंवार होणाऱ्या वादाबाबत श्यामची समजूत काढण्यासाठी मयत छाया त्याच्या पती, आई व भावासह आली होती. समजूत काढण्याचा प्रयत्न सुरू असताना आरोपीने अचानक छाया जाधव यांच्या छातीवर चाकूने वार केला. गंभीर जखमी झालेल्या छाया जाधव यांना तातडीने कळवण ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

भांडण सोडविताना छाया यांचा भाऊ सोनू कराटे यांच्या दोन्ही हातांनाही चाकूचे वार लागून दुखापत झाली. घटनेनंतर पसार झालेल्या आरोपी श्याम माळी यास खामखेडा गावाचे लोकनियुक्त सरपंच ॲड. वैभव पवार यांनी ग्रामस्थांच्या मदतीने पोलिसांच्या ताब्यात दिले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून पोलीस अधिक तपास करीत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com